www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक तरुणांचा बुलंद आवाज मराठी

# युवक आधार

मुख्य संपादक - भारती आमले उपसंपादक - श्री विलास गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश पाटील सह संपादक - श्री मुकुंद कांबळे महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे

वर्ष : 3 अंक : ३८ गुरुवार दि. १६ ऑक्टोबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514




# स्वदेशी बनावटीचे स्वदेशी 'तेजस' नाशिकमधून घेणार भरारी!

( दैनिक युवक आधार )

नाशिक : भारतीय आकाश आता अधिक स्वदेशी होणार आहे! देशाच्या संरक्षण सामर्थ्याचे प्रतीक असलेले स्वदेशी लढाऊ विमान 'तेजस एमके-१ ए' आता नाशिकच्या भूमीतून आकाशात झेपावण्यास सज्ज झाले आहे. 'मेड इन इंडिया' या ध्येयाचे साक्षात रूप असलेले हे विमान शुक्रवारी (दि. १७) सकाळी साडेअकराला पहिली ऐतिहासिक भरारी घेणार आहे. संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत हा सोहळा होणार असून, यावेळी एचएएल प्रकल्पात कार्यान्वित करण्यात आलेल्या एचटीटी-४० या प्रशिक्षणार्थी विमानाच्या दुसरया उत्पादन साखळीचे उद्धाटन करण्यात येणार आहे. हा क्षण केवळ नाशिकसाठीच नव्हे, तर संपूर्ण भारताला अभिमानास्पद आहे. हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या नाशिक प्रकल्पात 'तेजस एमके-१ ए' हे लढाऊ विमान तयार करण्यात आले आहे. इंजिन उपलब्धतेतील विलंबामुळे 'तेजस एमके-१ ए'च्या वितरणात कालापव्यय झाला. हवाई दलातील लढाऊ विमानांचा असमतोल दूर करण्यासाठी एचएएलने उत्पादन वाढविण्यासाठी बंगळुरूनंतर नाशिक येथेही उत्पादन साखळी कार्यान्वित केली आहे. स्वदेशी तेजसच्या आधी या प्रकल्पात सुमारे ३०० सुखोई लढाऊ विमानांची बांधणी करण्यात आली होती. अलीकडेच मिग- २१ च्या निवृत्तीनंतर हवाई दलाची ताकद सहा दशकांतील सर्वात कमी पातळीवर येण्याच्या मार्गावर आहे.या पार्श्वभूमीवर एचएएल हलक्या तेजस लढाऊ विमानांचे उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहे. त्या अंतर्गत बंगळुरू येथे दोन तर नाशिकमध्ये एक उत्पादन साखळीचे नियोजन करण्यात आले. त्यासाठी सुमारे १५० कोटींची गुंतवणूक करण्यात आली. नाशिक प्रकल्पात वार्षिक आठ विमानांची निर्मिती होईल. पुढील काही वर्षांत भारतीय हवाई दलाच्या ताफ्यात जवळपास २०० तेजस लढाऊ विमानांच्या नवीनतम आवृत्ती समाविष्ट केल्या जाणार आहेत. स्वदेशी बनावटीचे हलके तेजस हे ४.५ पिढीतील विमान मानले जाते. तेजस विमानाच्या संकल्पनेपासून ते त्याच्या चाचणीपर्यंत, भारतीय हवाई दलाचा चमू या निर्मिती प्रक्रियेत सहभागी होता. दरम्यान, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांचे गुरूवार (दि.१६) रोजी सायंकाळी ओझर विमानतळावर आगमन होणार आहे. सायंकाळी त्यांच्या हस्ते ओझर मिनी स्मार्ट टाऊनशिपचे उदघाटन होणार आहे. शुक्रवारी सकाळी



११: वाजता राजनाथ सिंह यांच्या हस्ते तेजस एमके-१ए च्या तिसऱ्या उत्पादन साखळीचे उदघाटन होईल. तसेच एचएएल प्रकल्पात कार्यान्वित करण्यात आलेल्या एचटीटी४० या प्रशिक्षणार्थी विमानाच्या दुसऱ्या उत्पादन साखळीचे उदघाटन होणार आहे.



युनिव्हर्स कराटे मार्शल आर्ट अकॅडमी इंडियाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या अखिल भारतीय खुली कराटे स्पर्धेत उलवे नोडमधील रामशेठ पब्लिक स्कुलच्या कराटेपटूनी चमकदार कामगिरी केले. प्रिनल भालेराव व मोहम्मद इफराज शेख या दोन्ही विद्यार्थ्यांनी काटा प्रकारात कांस्य पदक पटकाविले. त्याबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख यांनी अभिनंदन केले. यावेळी प्राचार्य किरण कुमार सुथार, क्रीडा प्रशिक्षक मंदार मुंबईकर आदी उपस्थित होते.

( दैनिक युवक आधार )

## शिवसेनेच्या मानसी पुरो यांची उपसरपंचपदी बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**




चाणजे ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदासाठी आज पार पडलेल्या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या मानसी पुरो यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या पदासाठी मानसी पुरो यांचा एकमेव उमेदवारी अर्ज दाखल झाल्याने निवडणूक निर्णय अधिकारी यांनी त्यांची बिनविरोध निवड जाहीर केली.

उपसरपंचपद रिक्त झाल्याने 14 ऑक्टोबर2025 रोजी चाणजे ग्रामपंचायत कार्यालयात ही निवडणूक घेण्यात आली होती.

मानसी पुरो यांची बिनविरोध निवड होताच ग्रामपंचायतीत जल्लोष करण्यात आला ग्रामस्थ आणि शिवसैनिकांनी फटाके फोडून, पुष्पगुच्छ देऊनत्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव करीत नवनिर्वाचित उपसरपंचांचे स्वागत केले. शिवसेना (उबाठा) च्या नेतृत्वाखाली चाणजे ग्रामपंचायतीत महिला नेतृत्वाचा नवा अध्याय सुरू झाल्याचे नागरिकांकडून सांगण्यात आले.

## घारापुरीच्या बेटावर महिलांचा आर्थिक बचत गट सुरू



**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**

घारापुरी हे फक्त ऐतिहासिक बेट नाही, तर आता स्वावलंबनाचं बेट बनत चाललंय. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानांतर्गत आज दि. 14 ऑक्टोबर 2025 रोजी ग्रामपंचायत कार्यालयात घारापुरी येथील महिलांच्या बचतगटांसाठी एक विशेष शिबिर घेण्यात आलं. या शिबिरात बचतगट अधिकारी श्री. नेमाडे साहेब यांनी महिलांना मार्गदर्शन करून स्वावलंबनाचा नवा मंत्र दिला.

घारापुरी हे बेट असल्याने रोजगाराच्या संधी अत्यंत मर्यादित आहेत. पण या बेटावरच्या महिला हार मानायला तयार नाहीत. घर, संसार, समुद्र आणि संघर्ष यांच्या संगमावर उभ्या राहून त्यांनी आता बचतगटांच्या माध्यमातून स्वतःचा आर्थिक कणा मजबूत करण्याचं ठरवलं आहे.

सरकारकडून या बचतगटांसाठी भरीव निधी उपलब्ध असून, एकत्र येऊन काम करणाऱ्या महिलांना याचा थेट लाभ मिळणार आहे. या माध्यमातून बेटावरील महिलांना केवळ रोजगारच नव्हे, तर 'आर्थिक स्वातंत्र्याचा सागर' गवसणार आहे. यावेळी सरपंच मीना भोईर, उपसरपंच बळीराम ठाकूर, सदस्य, ग्रामसेवक व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सुरगाणा महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले , सुरगाणा**

महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात मराठी व ग्रंथालय विभागांतर्गत प्राचार्य डॉ. सी. जी. दिघावकर यांच्या मार्गदर्शनाखाली १५ आक्टोंबर वाचन प्रेरणा दिन व भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम जयंती साजरी करण्यात आली.




कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारताचे माजी राष्ट्रपती थोर अवकाश शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

या शैक्षणिक सुपरवाझर प्रा. सुरेश भोये यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की सध्याच्या विज्ञान तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थी मोठ्या प्रमाणात भ्रमणध्वनीवर जास्त वेळ वाया घालवत आहेत परंतु तसे न करता विद्यार्थ्यांनी वर्गातील अभ्यासक्रमाबरोबरच अवांतर वाचनाची सवय लावली तर शब्द सामग्री, आत्मविश्वास बाहेरच्या जगातील ज्ञान अवगत होण्यासाठी भर पडेल याचे उदा सांगत प्रा.भोये यांनी भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए पी जे अब्दुल कलाम यांचे जीवनचरित्र उलगडून सांगितले डॉ. कलाम हे वैज्ञानिक, लेखक, प्राध्यापक, अवकाश शास्त्रज्ञ,विचारवंत ही पदे वाचन संस्कृती जोपासल्यामुळे गरीबीवर मात करून आपले स्वप्न साकार करू शकले त्यांचा आदर्श आपल्यासाठी महत्त्वाचा आहे. असे सांगितले .

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. जोपळे यांनी केले तर आभार प्रा. केशव गावित यांनी मानले यावेळी कार्यक्रमाला ग्रंथपाल संजय महाजन,प्रा.बी.डी. धुम,प्रा.भगवान महाले, डॉ.सविता शिरसट,प्रा.कृष्णा गांगोडे, प्रा. देवचंद कवर यांच्यासह महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते विद्यार्थी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते.




## मोरा सागरी पोलीस ठाण्याची इमारत उद्घाटना अगोदरच भंगारात निधी अभावी रखडले काम!




**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी प्रमुख / प्रदीप पाटील**

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजन शुन्य कारभारामुळे 85 लाख रुपये खर्च करून उभारण्यात आलेली नवीमुंबई पोलीस आयुक्त हद्दीतील मोरा सागरी पोलीस ठाण्याची नवी इमारत उद्धाटना अगोदरच भंगारात निघाली आहे. त्यामुळे शासनाकडून खर्च करण्यात आलेला 85 लाखांचा निधी वाया जातो की काय असा प्रश्न उरणच्या आमजनतेला पडला आहे. कामाच्या झालेल्या दिरंगाईने ईमारतीचे प्रचंड नुकसान तर झालेच पण आत्ता ती इमारत पूर्णत्वास नेण्याचा खर्च देखील वाढला आसून तो कोट्यावधी रुपयाच्या घरात जाण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

उरण हे बेट असून सागरी किनारपट्टी भागातून होणाऱ्या दहशतवादी हल्ल्यां वर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि देशातील कायदा सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शासनाने किणारपट्टी वरील सागरी पोलीस ठाण्यांना विशेष महत्त्व प्राप्त करून दिले आहे.त्या अनुषंगाने मुंबई शहराच्या हाकेच्या अंतरावर असलेल्या मोरा,करंजा बंदर आणि घारापुरी परिसरावर नजर ठेवण्यासाठी शासनाने नवीमुंबई पोलीस आयुक्तांच्या हद्दीत नव्याने मोरा सागरी पोलीस ठाण्याची निर्मिती केली. सदर पोलीस ठाण्यासाठी सुसज्ज इमारत असावी, यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडून उरण शहरातील पेन्शनर पार्क जवळील शासकीय जागेजवळील भूखंडावर शासनाकडून प्राप्त झालेल्या 85 लाख निधीतून सुसज्ज इमारतीचे बांधकाम 2018 ते 2020 या वर्षात हाती घेण्यात आले होते.

परंतु पुढील निधी अभावी सदर पोलीस ठाण्याच्या इमारतीचे कामकाज गेल्या 6 वर्षा पासून बंद असल्याने अर्धवट स्थितीतील इमारतीच्या छताला पावसाळ्यात गळती लागली आहे.त्यात शहरात उध्दभवणाऱ्या पुर परिस्थितीचे पाणी सदर इमारतीच्या तळमजल्यावर साचून राहते,तर इमारती समोर जंगली रोपांचे जंगल वाढल्या मुळे या ठिकाणी रात्रो तळीरामाचा अड्डा तर कधी अनैतिक कामासाठी हीत्याचा वापरकेला जातो,एकंदरीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियोजन शुन्य कारभारामुळेआणि शासनाच्या बेफिकीरपणामुळे उध्दघाटना अगोदरच सदरची इमारत भंगारात पडून जातेकी काय ? असा सवाल निर्माण झाला आहे.तरी राज्यातील जनतेचा पैसा वाया जातो याची चर्चा सध्या उरणातनाक्या नाक्यावर रंगू लागली आहे.

# पिंपरखेड जिल्हा परिषद शाळेत आकाश कंदील बनवा कार्यशाळा उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**आष्टी प्रतिनिधी**
**बाळासाहेब रकटाटे**

आष्टी तालुक्यातील पिंपरखेड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये दिवाळी सणाच्या पार्श्वभूमीवर "आकाश कंदील बनवा कार्यशाळा" हा सर्जनशील उपक्रम अत्यंत उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांमध्ये कलात्मकता, सर्जनशीलता आणि स्वतः काहीतरी बनविण्याची प्रेरणा निर्माण व्हावी या उद्देशाने ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती.

राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक अण्णासाहेब घोडके सर आणि सतीश एकशिंगे सर यांनी विद्यार्थ्यांना आकाश कंदील बनवण्याची संपूर्ण प्रक्रिया समजावून सांगितली. कागदाची घडी घालणे, रंगांची सांगड





लावणे, आकार देणे, चिकटवणे या सर्व गोष्टींचे प्रात्यक्षिक देत त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनीही स्वतःच्या हातांनी सुंदर, रंगीबेरंगी आणि आकर्षक आकाश कंदील तयार केले.

या कार्यशाळेत शाळेतील सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या कंदिलांमुळे शाळेचा परिसर रंगांनी उजळून गेला आणि विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाची लहर पसरली. स्वतःच्या हातांनी बनवलेला आकाश कंदील घरात लावण्याचा आनंद विद्यार्थ्यांसाठी अनमोल ठरला.

मुख्याध्यापक अस्लम शेख सर यांनी सांगितले की अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, एकाग्रता आणि हात कौशल्य विकसित होते. विद्यार्थ्यांना पारंपरिक कलांचे शिक्षण मिळते तसेच "स्वतः बनवलेला कंदील" ही भावना त्यांच्यात आत्मविश्वास वाढवते.

या प्रसंगी सहशिक्षक महादेव आमले सर, अतुल चव्हाण सर, हिवरा शाळेचे मुख्याध्यापक देशमुख सर, सतीश एकशिंगे सर आणि अण्णासाहेब घोडके सर उपस्थित होते. सर्व शिक्षकांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम यशस्वीपणे पार पडला.

कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांनी आपल्या स्वनिर्मित कंदिलांचे प्रदर्शन लावले. शाळेच्या आवारात रंगीत दिव्यांनी सजावट करण्यात आली होती, ज्यामुळे दिवाळीचा उत्साह अधिकच वाढला.

अशा प्रकारच्या सर्जनशील कार्यशाळांमुळे विद्यार्थ्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होते आणि शिक्षणासोबतच आनंद, संस्कार आणि कलात्मकतेची जाणीव निर्माण होते.

## वाहतूक शाखा न्हावा-शेवाच्या वतीने वीर वाजेकर विद्यालय वाहतूक नियमांचे प्रबोधन



**दैनिक युवक आधार**
**कॉलेजकट्टा/आरती सुरवसे**

आयसीआयसीआय लोम्बार्ड इंन्सूरन्स व सहयोग फाउंडेशन यांच्या संयुक्तविद्यमाने दीपावली सणाचे औचित्य साधून दीपावलीच्या पूर्व संध्येला वीर वाजेकर विद्यालय, फुंडे येथे वाहतूक नियमांचे प्रबोधन व हेल्मेट वाटपाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

सदर कार्यक्रमात उपस्थित विद्यार्थी व शिक्षकवृंद,शालेय शिक्षकेतर कर्मचारी आणि पालक वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते या सर्वाना वाहन चालवविण्याचे नियंम,वहान चालवीत असताना मोबाईलवर बोलू नये, सिग्नल जंप करू नये तसेच रस्ता सुरक्षा आणि वाहतुकीचे नियम याबाबत नाव्हा- शेवा वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जी.एम मुजावर, वीर वाजेकर हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज फुंडेचे प्राध्यापक श्री.साळुंखेसर व आयसीआयसीआय लोम्बार्ड इंन्सूरन्सच्या वतीने विनय बर्वे या सर्वांनी मार्गदर्शन केले.शेवटी आयसीआयसीआय लोम्बार्ड इंन्सूरन्स व सहयोग फाउंडेशन यांच्या संयुक्तविद्यमाने वीर वाजेकर विद्यालय, फुंडे येथे विद्यार्थ्यांना हेल्मेट वाटण्यात आले याचा लाभ विर वाजेकर विद्यालयाचे 60 ते 70 विद्यार्थी, पालक व शिक्षक वर्ग. यांनी घेतला

## स्वच्छ भारत मिशनला हरिहरेश्वरमध्ये तडा – सुलभ शौचालय झाडीखाली गडप, ग्रामपंचायतीकडून गंभीर दुर्लक्ष!

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी**

हरिहरेश्वर केंद्र आणि राज्य सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामपंचायतीमार्फत उभारण्यात आलेली सुलभ शौचालये सध्या झाडीखाली गडप होण्याच्या मार्गावर आहेत. वस्तू नवीन असूनही ग्रामपंचायतीच्या निष्काळजीपणामुळे त्यांची दुरावस्था झाली आहे. परिसरातील दाट झाडाझुडपांमुळे शौचालयात प्रवेश करणेच अशक्य झाले आहे.

स्थानिकांच्या मते, या झाडाझुडपांमध्ये साप, विंचू आणि इतर विषारी प्राण्यांचे वास्तव्य होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. "स्वच्छ भारत मिशनचा हेतू गावात स्वच्छता आणि आरोग्य राखणे हा असताना, इथे तर अस्वच्छता आणि भीतीचे साम्राज्य निर्माण झाले आहे," असे ग्रामस्थांनी सांगितले.

ग्रामपंचायतीकडे वारंवार तक्रारी केल्या गेल्या असूनही, आजपर्यंत कोणतीही साफसफाई किंवा दुरुस्तीची कामे करण्यात आलेली नाहीत. संबंधित शौचालयाची देखभाल व स्वच्छता ही जबाबदारी असलेले




अधिकारी व सदस्य याकडे दुर्लक्ष करत असल्याचे चित्र स्पष्ट दिसते.

स्थानिक नागरिकांचा प्रश्न साधा आहे — "नवीन वस्तू असताना ती वापरण्यायोग्य का नाही?"

स्वच्छ भारत अभियानाचे आदर्श ध्येय वास्तवात उतरवायचे असेल, तर हरिहरेश्वर ग्रामपंचायतीने तत्काळ पावले उचलून या झाडीचे निर्मूलन करून शौचालये वापरण्यायोग्य करणे गरजेचे आहे.

## आदर्श शिक्षक श्री.डिगांबर घोडके सर यांची स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा भारत माध्यमिक विद्यालय चिंचांबाभर येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

भारत माध्यमिक विद्यालय चिंचांबाभर यांच्या वतीने स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेमध्ये राज्य शासनाने नुकताच "क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले" आदर्श राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्काराने सन्मानित भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी आंतरराष्ट्रीय जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, साखरा (ता. वाशिम जि. वाशिम) येथील आदर्श पदवीधर शिक्षक श्री. डिगांबर भगवान घोडके सर यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहून विद्यार्थ्यांना व शिक्षकांना यशस्वीतेचा मूलमंत्र दिला.

या कार्यशाळेत त्यांनी NMMS, होमी भाभा, नवोदय प्रवेश परीक्षा, मंथन स्पर्धा परीक्षा,शिष्यवृत्ती परीक्षा, अशा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये विद्यार्थ्यांना यश मिळविण्यासाठी आवश्यक तयारीची सखोल माहिती दिली. त्यांनी






विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, परिश्रम व सातत्याचे महत्त्व अधोरेखित करत स्पर्धा परीक्षांतील यशाचे सूत्र स्पष्ट केले.कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान श्री.मधुकरराव शिंदे, प्राचार्य भारत माध्यमिक विद्यालय चिंचांबाभर यांनी भूषविले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. दीपक सानप, राष्ट्रीय कबड्डी खेळाडू श्री. विठ्ठल महाले सर तसेच गावातील मान्यवर व शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दिलीप सानप सर यांनी समर्थपणे केले, तर आभारप्रदर्शन श्री. वाठोरे सर यांनी केले.या प्रसंगी आदर्श राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक श्री.डिगांबर घोडके सर यांचा संस्थेच्या वतीने मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार करण्यात आला. शैक्षणिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय योगदानाबद्दल सर्व उपस्थितांनी मन:पूर्वक अभिनंदन व्यक्त केले.

## श्री शिवाजी विधी महाविद्यालय परभणी येथे वाचन प्रेरणा दिवस साजरा

**दैनिक युवक आधार**
**सेलू/शिवाजी पवार**

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ छत्रपती संभाजी नगर संचलित श्री शिवाजी महाविद्यालय परभणी येथे बुधवार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.एम.एल. धर्मापुरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली भारताचे पूर्व राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती वाचन प्रेरणा दिवस म्हणून साजरी करण्यात आली. पहिल्या सत्रात डॉ.हर्षा सूर्यवंशी यांच्या हस्ते अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना अभिवादन करण्यात आले तर दुसऱ्या सत्रात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाविषयी आवड निर्माण होऊन ती वृद्धिंगत होण्याकरिता डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम लिखित "अग्निपंख" या ग्रंथावर आधारित प्रश्नमंजुषेचे आयोजन ग्रंथपाल डॉ. सचिन व्हि. कदम यांनी केले होते. यात महाविद्यालयातील विविध अभ्यासक्रमातील ४५ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

सदरील सहभागी विद्यार्थ्यांना दिनांक ०३ ऑक्टोबर पासून अग्निपंख हा ग्रंथ उपलब्ध करून देण्यात आलेला होता. सदरील प्रश्नमंजुषे




मध्ये प्रा. शाम सुक्रे आणि प्रा. क्षितिज गिरबिडे यांनी समवेक्षक म्हणून काम पाहिले. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या तीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या वतीने रोख रक्कम, स्मृतिचिन्ह आणि प्रमाणपत्र देण्यात येणार आहेत.

प्रश्नमंजुषेच्या यशस्वी आयोजना बद्दल म. शि. प्र. मंडळाचे सन्माननीय अध्यक्ष मा. प्रकाश सोळंके, सरचिटणीस मा. सतीश चव्हाण तसेच महाविद्यालय विकास समितीचे सन्माननीय सदस्य मा. श्री चंद्रशेखर नखाते, मा. श्री. गोविंद कदम, मा. श्री मकदुम मोहिउद्दिन, मा. श्री. संतोष बोबडे, मा. ॲड. दिपक देशमुख, मा. ॲड. अशोक शिंदे व मा. श्री. संतोष इंगळे यांनी अभिनंदन केले आहे.

# पूरग्रस्त भागात कामोठेतून दोन गाड्या जीवनावश्यक वस्तूचे वाटप

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

कामोठे रहिवाशी सामाजिक सेवा संस्था, ओम शिव शंकर सेवा मंडळ कामोठे व जय हरी महिला मंडळ कामोठे, संस्थापक अध्यक्ष पोपटशेठ आवारी यांच्या मार्गदर्शनाखाली पूरग्रस्त भाग बीड व शेवगाव येथे शेतकऱ्यांना दोन गाड्या जीवनावश्यक वस्तू पाठवण्यात आल्या. या वस्तूंची किंमत जवळजवळ सहा लाख रु. होती. हे करत असताना, पोपटशेठ आवारे, सुवर्णा वाळुंज, वर्षा चौधरी,प्रमिला आहेर, गीता उंडे, रंजना ढवन,प्रीती खिलारी संजना वाघमारे, सुप्रिया माने,सुरेखा गुंजाळ संगीता पवार, पुष्पा पोटे, उषा आवारी, साबळे



ताई, सत्रे ताई सुजाता चेडे, मनीषा वनवे, शारदा तोंडे, विनंती आंधळे, रंजना शिंदे, लता मोरे, ज्ञानेश्वर सत्रे, शोभा डेरे, ज्योती शिकारे, मंगल आवारी, शुभांगी कड, सुनिता वाबळे, रोहिणी डेरे, जाधव ताई, वनिता वाबळे, पल्लवी आवारी या सर्वांनी या सर्व वस्तु कामोठेमध्ये फिरून जमा केल्या.

मंडळातील सर्व सहकारी महिलानी या सर्व वस्तू पॅकिंग केल्या. मंडळाचे कार्यकर्ते दादाभाऊ वाळुंज, संदीप पोटे, योगेश चौगुले, अनिल पोटे, रवी बोहोत यांनी मदत केली. पोपटशेठ आवारे, सुरेश ढवन, आत्माराम आरोटे, बाबाजी ढोमे या सर्वांनी बीड आणि शेवगाव येथे जाऊन वस्तु प्रत्येक गरजु व्यक्तीपर्यंत पोहच केल्या. यावेळी मंडळाचे अध्यक्ष पोपट आवारे यांचे सर्व बिडकर आणि शेवगावकरांनी आभार मानले.

## वाशिम जिल्हा व अंतर जिल्ह्यातील चोरी करणारी टोळी जेरबंद ८,२४,०००रू किंमतीच्या बुलेट सह नऊ मोटार सायकली जप्त

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

**रिसोड:-:** गेल्या काही दिवसापासून पोलीस स्टेशन रिसोड हद्दीतून मोटरसायकल चोरी जाण्याचा घटना घडल्याने पोलीस स्टेशन रिसोड चे ठाणेदार रामेश्वर चव्हाण यांनी डी. बी. पथकास मार्गदर्शन करून चोरांचा शोध घेऊन मोटरसायकल हस्तगत करण्याबाबत सूचना दिल्या होत्या.

त्यावरून डी. बी. पथकाने तांत्रिक व आधुनिक पद्धतीने व तपास करून व मिळालेल्या




गुप्त माहितीवरून दिनांक १२/१०/२०२५ रोजी संशयित इसम नामे सचिन उर्फ मिठू अशोक मानकर, वय २८ वर्षे, रा. रामनगर, ता . रिसोड, जि. वाशिम याच ताब्यात घेऊन त्या चोरी गेलेल्या मोटार सायकली बाबत कौशल्यपूर्वक विचारपूस केली असता त्याने वाशिम व हिंगोली जिल्ह्यातील मोठा सायकली चोरी केल्याची कबुली दिली. त्यानंतर नमूद आरोपी याचे कडून पोलीस स्टेशन रिसोड व वाशिम शहर इत्यादी ठिकाणच्या एकूण ०९ मोटार सायकल किंमत ८,२४,०००/-रु. किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक अनुज तारे (खझड), अप्पर पोलीस अधीक्षक लता फड, सहाय्यक पोलीस अधीक्षक, वाशिम नवदीप अग्रवाल (खझड) यांचे मार्गदर्शनाखाली व पोलीस निरीक्षक रामेश्वर चव्हाण यांची नेतृत्वाखाली डी. बी . पथकाचे पोलीस उपनिरीक्षक सचिन गोखले, पोलीस हवालदार प्रशांत राजगुरू, महादेव चव्हाण, आशिष पाठक, पोलीस अंमलदार रवी आढागळे, विनोद घनवट, परमेश्वर भोने, सुनील तिवाले, अमोल ठाकरे, विश्वास चव्हाण तसेच सायबर सेलचे संदीप वाकुडकर यांनी केली आहे.

## आदिवासी नागरिकांच्या प्रश्नांवर आमदार महेश बालदी यांची आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्याशी भेट

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :** उरण विधानसभा मतदारसंघातील आदिवासी नागरिकांना भेडसावणाऱ्या रस्ते, पाणी, वीज, घरकुल आदी मूलभूत सुविधांच्या प्रश्नांबाबत राज्याचे आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांची आमदार महेश बालदी यांनी भेट घेऊन सविस्तर चर्चा केली.

या चर्चेदरम्यान आमदार बालदी यांनी आदिवासी भागातील लोकांच्या अडचणींचा वेध घेत तातडीने आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी केली. मंत्री डॉ. उईके




यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित प्रश्न मार्गी लावण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचे आश्वासन दिले. या वेळी भारतीय जनता पक्षाचे उत्तर रायगड जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, खालापूर मंडल अध्यक्ष प्रविण मोरे, तसेच बोरगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच प्रितेश मोरे उपस्थित होते.

दैनिक युवक आधार
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR
Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle



सेलू तालुक्यातील डुगरा येथे महिला बचत गटाच्या वतीने सीआरपी ताई दिपाली शिवाजीराव मोकाटे व कृषी सखी अनिता सखाराम मगर यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.यावेळी उपस्थित ग्रामपंचायत ब्राह्मणगाव-डुगरा सरपंच रमेश तारडे व बचत गटातील इतर महिला दिसत आहेत.

( दैनिक युवक आधार)

# ' उत्कृष्ट दैनिक प्रतिनिधी ' शिवसह्याद्री सहकारी पतपेढी तर्फे मानचिन्ह देऊन सत्कार

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर** : रविवार दिनांक 12 ऑक्टोबर परेल मुंबई येथे शिव सह्याद्री सहकारी पतपेढी लिमिटेड पार पडलेल्या भव्य समारंभात शिव सह्याद्री पतपेढीचे सर्वेसर्वा भाई ज्ञानेश्वर वांगडे यांच्यातर्फे ' उरण तालुक्यातील 'शिव सह्याद्री सहकारी पतपेढीचे दैनिक प्रतिनिधी श्री अमृत दिनकर सोंडकर आणि त्यांच्या पत्नी सोबत उत्कृष्ट दैनिक प्रतिनिधी म्हणून सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले आहे यावेळी श्री सोंडकर यांनी सन 2024 ते 2025 या कालखंडात ' दोन कोटी दहा लाख ' इतकी



मोठी रक्कम दैनिक बचत आणि विविध ठेवींद्वारे आपल्या विविध ग्राहकांकडून जमा करून शिव सह्याद्रीच्या वार्षिक उलाढाली मध्ये मोठा हातभार लावला आहे म्हणून हा विशेष सत्कार करून भाई वांगडे श्री अमृत सोंडकर यांना शाबासकी देऊन इथून पुढेही असेच मोठे टप्पे पार करीत प्रगती करा असा मोलाचा सल्ला दिला. यावेळी श्री सोंडकर यांनी आपल्या वक्तृत्व शैली आणि चांगल्या व्यवहारामुळे हा टप्पा पार करू शकलो .

असे सांगितले त्याचप्रमाणे माझ्यावर विश्वास ठेवून विविध क्षेत्रातील व्यापारी, व्यावसायिक, खाजगी कार्यालय, लहान व्यवसायिक, आणि रहिवाशी, ग्रामस्थ यांनी माझ्याकडे ठेवी ठेवल्या त्याबद्दल मनःपूर्वक आभार मानले माझी पत्नी आणि कुटुंब यांच्या सहकार्यामुळे मी हे शक्य करू शकलो भाई वांगडे यांच्यात हस्ते हा सत्कार आणि सन्मानचिन्ह मिळाल्याबद्दल मला वैयक्तिक खूप आनंद झाला आहे असेही त्यांनी कबूल केले.

# डोनाल्ड ट्रम्प यांना नोबेल पुरस्कार नाहीच

जागतिक पातळीवर सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या नोबेल पुरस्काराची घोषणा दरवर्षी ऑक्टोबरच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात केली जाते. मानव कल्याणासाठी झटणाऱ्या विविध क्षेत्रातील शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, लेखक आणि जागतिक पातळीवर शांततेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीस किंवा संस्थेस हा पुरस्कार दिला जातो. यावर्षी या पुरस्काराकडे सगळ्या जगाचे लक्ष लागले होते कारण यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मलाच मिळणार असा ( फाजील ) आत्मविश्वास अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना होता. तसे त्यांनी अनेकदा बोलूनही दाखवले होते त्यामुळे त्यांना खरंच हा पुरस्कार मिळेल का? याची उत्सुकता जगभर होती. शांततेच्या नोबेल पुरस्काराची घोषणा शुक्रवारी दहा ऑक्टोबरला झाली आणि त्यावरील सस्पेन्स संपला. शांततेचा नोबेल पुरस्कार अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना मिळालाच नाही. यावर्षीचा शांततेचा नोबेल पुरस्कार मिळाला तो व्हेनेझुएलाच्या मारिया कोरिना मचाडो यांना आणि मचाडो यांना पुरस्कार का मिळाला यापेक्षा ट्रम्प यांना पुरस्कार का मिळाला नाही याचीच जगभर याची चर्चा झाली. डोनाल्ड ट्रम्प यांनी हा पुरस्कार मलाच मिळणार यासाठी मी सात युद्धे थांबवली व जगात शांती निर्माण केली अशी सातत्याने वल्गना करून एकप्रकारे नोबेल पुरस्कार समितीवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या दबावाला नोबेल पुरस्कार समिती बळी पडली नाही. त्यांनी योग्य निर्णय घेत डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार नाकारीत योग्य व्यक्तीला पुरस्कार दिला याबद्दल नोबेल पुरस्कार समितीचे कौतुकच करायला हवे. डोनाल्ड ट्रम्प यांना हा पुरस्कार हवा होता त्यासाठी त्यांनी मोठा थयथयाट केला. सातत्याने मी सात युद्धे थांबवली अशी वल्गना




केली मात्र अमेरिकेनेच अनेक देशांना फुस लावून युद्धाच्या गर्तेत ढकलले हे लपून राहिले नाही. आधी भांडण लावून देणे आणि नंतर ते सोडवण्याचे नाटक करणे त्यातून आपला स्वार्थ साधणे हेच अमेरिकेचे धोरण आहे. डोनाल्ड ट्रम्प असो की अमेरिकेचे याआधीचे राष्ट्राध्यक्ष त्यांनी इतर देशांकडे फक्त आपल्या शस्त्रास्त्रांचे गिऱ्हाईक म्हणून पाहिले. आपली शस्त्रास्त्रे विकली जावीत यासाठी अमेरिकेने अनेक देशात युद्ध पेटवली हा इतिहास आहे.

आता हेच पाहा ना... भारत



पाकिस्तानचे युद्ध मीच थांबवले अशी शेखी मिरवणारे व त्याद्वारे नोबेल पुरस्कारावर हक्क सांगणारे डोनाल्ड ट्रम्प पाकिस्तानला घातक शस्त्रात विकणार असल्याची बातमी नुकतीच वर्तमानपत्रात वाचली आता. जर डोनाल्ड ट्रम्प हे खरंच शांततेचे भोक्ते असते तर त्यांनी पाकिस्तानला शस्त्रास्त्रे का विकली असती ? पाकिस्तान या शस्त्रांचा वापर भारताविरोधात करणार जर पाकिस्तानने हे शस्त्र भारताविरुद्ध वापरले तर भारतही त्याला उत्तर देणार मग पुन्हा संघर्ष उफाळणार. जर ही शस्त्रे दहशतवाद्यांच्या हातात पडली तर भारतासोबतच संपूर्ण जगाला धोका पसरू शकतो. मग पाकिस्तानसारख्या दहशतवादी देशांना शस्त्रे विकून जगभर अशांतता पसरवणाऱ्या ट्रम्प यांना शांततेचा नोबेल पुरस्कार कसा मिळणार ? म्हणूनच नोबेल पुरस्कार समितीने घेतलेला हा निर्णय अतिशय योग्य आहे. ज्या मारिया माचाडो यांना हा पुरस्कार देण्यात आला त्या त्याच्या हकदार होत्याच. मारिया मचाडो या हॉवर्ड विद्यापीठातील पदवीधर आहेत आणि त्यांच्या व्हेनेझुएला देशातील हुकुमशाही विरुद्ध त्यांनी आवाज उठवला आहे. भ्रष्ट हुकुमशाही विरुद्ध स्वतःचा जीव धोक्यात घालून लढणाऱ्या मारिया मचाडो या लोकशाहीचा आवाज आहेत. मागील वर्षी या देशात निवडणुका झाल्या. या निवडणुकीत मचाडो या उभ्या राहिल्या मात्र त्यांना निवडणुकीत उभे राहण्यापासून रोखण्यात आले. त्यांना अपात्र घोषित करून त्यांचे राजकारण संपवण्याचा प्रयत्न करण्यात आला. पण त्या सरकारच्या या दमनशाहिला दबल्या नाहीत. त्यांनी या विरोधात आवाज उठवला. संपूर्ण देशाला हुकुमशाही विरुद्ध एकत्र केले. देशात लोकशाही टिकावी म्हणून जीव धोक्यात घालून लढल्या त्यामुळेच त्यांची या पुरस्कारासाठी झालेली निवड सर्वार्थाने योग्य आहे.

डोनाल्ड ट्रम्प आणि मारिया मचाडो यांची तुलना होऊ शकत नाही.

लोकशाहीच्या नावाखाली हुकुमशाही राबवणारे ट्रम्प या पुरस्कारासाठी पात्र ठरूच शकत नाही म्हणूनच नोबेल पुरस्कार समितीच्या या निर्णयाचे जगभर कौतुक होत आहे.

**- श्याम ठाणेदार**

# भुकेविरुद्धचा लढा आणि शाश्वत अन्नसुरक्षा : जागतिक अन्न दिनाचे सामाजिक भान

दरवर्षी १६ ऑक्टोबर हा दिवस 'जागतिक अन्न दिन' म्हणून जगभर साजरा केला जातो. १९४५ साली १६ ऑक्टोबर रोजी कॅनडा येथील क्वेबेक सिटी येथे ४२ देशांच्या प्रतिनिधींनी संयुक्त राष्ट्रांच्या अन्न आणि कृषी संघटनेची (Food and Agriculture Organization – FAO) स्थापना केली. त्यामुळेच हा दिवस 'जागतिक अन्न दिन' म्हणून साजरा केला जातो." जागतिक अन्न दिन हा केवळ एका संस्थेचा वर्धापनदिन नसून तो जगाच्या सर्वात मोठ्या आणि गंभीर समस्यांपैकी एक असलेल्या भूक, कुपोषण, दारिद्र्य आणि अन्न वितरणातील असमानता या विषयांवरील सामाजिक जागृतीचा दिवस आहे. या दिनाचे मूळ उद्दिष्ट म्हणजे जगातील प्रत्येक व्यक्तीला पौष्टिक, सुरक्षित आणि पुरेसे अन्न मिळावे यासाठी आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि स्थानिक स्तरावर प्रयत्नांना चालना देणे हे आहे.

आजच्या घडीला जगात अन्न उत्पादन वाढले असले तरी भूक आणि कुपोषणाची समस्या चिंताजनक स्वरूपात कायम आहे. FAO च्या The State of Food Security and Nutrition in the World (SOFI) २०२५ या अहवालानुसार, २०२४ साली जगभर सुमारे ६३८ ते ७२० दशलक्ष लोकांना (म्हणजेच अंदाजे ६३ ते ७२ कोटी लोकांना) पुरेसे अन्न मिळत नाही. तसेच सुमारे २ अब्ज लोकांना पौष्टिक आणि सुरक्षित अन्नाची कमतरता भासते, तर जागतिक लोकसंख्येपैकी सुमारे ८.२ टक्के लोक अजूनही भुकेशी झगडत आहेत. FAO आणि World Food Programme (WFP) च्या संयुक्त अहवालानुसार, वाढती अन्नमूल्यवाढ, हवामान बदल, सशस्त्र संघर्ष, आणि जागतिक अर्थव्यवस्थेतील असमानता यांमुळे अनेक देशांतील अन्नसुरक्षेवर गंभीर परिणाम झाला आहे. या पार्श्वभूमीवर 'जागतिक अन्न दिन' दरवर्षी विविध



विषयांवर जनजागृती निर्माण करतो. २०२५ साली या दिनाची अधिकृत थीम FAO ने 'Hand in Hand for Better Foods and a Better Future' अशी निश्चित केली आहे. या थीमद्वारे जगभरातील देश, संस्था आणि व्यक्तींनी एकत्र येऊन अधिक पौष्टिक, टिकाऊ आणि समतामूलक अन्नव्यवस्था उभी करावी, असा संदेश देण्यात आला आहे.

अन्न हे मानवाच्या अस्तित्वाचे मूळ तत्त्व आहे. परंतु आज जगात अन्नाची निर्मिती, साठवण, वितरण आणि उपभोग या सर्व प्रक्रियांमध्ये प्रचंड असमानता आहे. विकसित देशांमध्ये अन्नाची नासाडी तर विकसनशील देशांमध्ये भुकेची तीव्रता दिसून येते.

भारतासारख्या कृषीप्रधान देशात अन्नउत्पादनाचा भव्य इतिहास असूनही भुकेचा शाप अजूनही लाखो लोकांच्या जीवनाला वेढून बसलेला आहे. देशातील प्रत्येकाला पुरेसे व पौष्टिक अन्न मिळावे ही बाब अजूनही आव्हानात्मक आहे. Global Hunger Index २०२४ नुसार भारताला १२७ देशांपैकी १०५ वे स्थान प्राप्त झाले आहे आणि त्याला 'गंभीर' (Serious) श्रेणीत वर्गीकृत करण्यात आले आहे. हा क्रमांक दक्षिण आशियातील इतर देशांपेक्षा खालचा आहे, जसे की नेपाळ (६९), श्रीलंका (६५), बांगलादेश (८१) आणि पाकिस्तान (१०२). अहवालानुसार भारतातील सुमारे १३.७ टक्के लोकसंख्या अंडरन्युरिश्ड आहे, म्हणजेच त्यांना दररोज आवश्यक असलेले कॅलरी मूल्य मिळत नाही. विशेषतः बालकांच्या आरोग्याच्या संदर्भात परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. देशातील ५ वर्षांखालील सुमारे ३५.५ टक्के मुले स्टंटिंग (उंची कमी असणे) तर १८.७ टक्के मुले वेस्टिंग (वजन कमी असणे) या पोषणअभावाशी संबंधित समस्यांनी ग्रस्त आहेत.

या आकडेवारीतून स्पष्ट होते की भारतात भूक आणि कुपोषण ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, आरोग्यविषयक आणि शैक्षणिक असमानतेशी घट्ट निगडित आहे. ग्रामीण भागात रोजगाराची अस्थिरता, महिलांच्या पोषणाबाबतची दुर्लक्षाची वृत्ती, अन्नधान्य वितरणातील त्रुटी, तसेच शहरी झोपडपट्ट्यांतील अस्वच्छता आणि पिण्याच्या पाण्याची टंचाई यामुळे अन्नसुरक्षेचे आव्हान अधिक गंभीर झाले आहे. यावर उपाय म्हणून 'प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना', 'राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम २०१३' (NFSA), आणि 'मिड-डे मील योजना'सारख्या उपक्रमांनी काही प्रमाणात दिलासा दिला असला, तरीही त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीची गरज तीव्रतेने जाणवते. अन्नसुरक्षा केवळ धान्य वितरणाच्या मर्यादेत न पाहता ती पोषण, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण या सर्व अंगांनी समजून घेणे आवश्यक आहे. कारण भूक ही मानवी विकासातील सर्वात मोठी अडथळा आहे, आणि जोपर्यंत प्रत्येक भारतीयाला पुरेसे, सुरक्षित आणि पौष्टिक अन्न मिळणार नाही, तोपर्यंत 'विकसित भारत' हे स्वप्न अपूर्णच राहील.

जागतिक पातळीवर 'भूक' ही केवळ आर्थिक समस्या नसून सामाजिक आणि पर्यावरणीय प्रश्नही आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे जमीन आणि पाणी यांसारख्या नैसर्गिक संसाधनांवर प्रचंड ताण पडत आहे. हवामान बदलामुळे शेतीचे स्वरूप झपाट्याने बदलत आहे. दीर्घकालीन दुष्काळ, अनियमित पाऊस, पूर, जमिनीची धूप, रासायनिक खतांमुळे झालेली मातीची हानी हे सर्व घटक अन्न उत्पादनावर विपरीत परिणाम घडवत आहेत. परिणामी शेतीतील उत्पादन कमी होते आणि अन्नधान्याचे दर वाढतात. शाश्वत अन्न प्रणाली (Sustainable Food Systems) हा आजच्या काळातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आहे. केवळ उत्पादन वाढवणे हे एकमेव उत्तर नाही, तर उत्पादन, वितरण, उपभोग आणि नासाडी कमी करणे या सर्व पायऱ्यांवर लक्ष देणे गरजेचे आहे. संयुक्त राष्ट्रांच्या शाश्वत विकास उद्दिष्टांपैकी (SDGs) दुसरे उद्दिष्ट "Zero Hunger by २०३०" म्हणजेच "२०३० पर्यंत भुकेचा अंत" हे आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करायचे असल्यास कृषी क्षेत्रात वैज्ञानिक तंत्रज्ञानाचा वापर, सिंचनाचे आधुनिकीकरण, पाण्याचा कार्यक्षम वापर, जैविक शेती, स्थानिक पिकांचे संवर्धन, तसेच अन्न साखळीत महिलांचा सहभाग वाढवणे अत्यावश्यक आहे.

महिलांची भूमिका अन्नसुरक्षेत अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामीण भागात स्त्रिया शेतीपासून ते अन्न साठवणूक आणि स्वयंपाकापर्यंत सर्व कामात हातभार लावतात. मात्र त्यांना आर्थिक निर्णयप्रक्रियेत स्थान मिळत नाही. त्यामुळे महिलांना कृषी प्रशिक्षण, बियाणे व खतांची सुलभ उपलब्धता, तसेच बाजारपेठेतील न्याय्य दर मिळावा यासाठी शासनाने ठोस धोरणे आखली पाहिजेत. अन्न ही केवळ भूक भागवणारी गोष्ट नसून ती संस्कृती, ओळख आणि समाजजीवनाचा अविभाज्य भाग आहे. भारतीय समाजात अन्नाला 'अन्नपूर्णा'चे रूप दिले गेले आहे. परंतु आधुनिक जीवनशैलीमुळे अन्नाच्या उपभोगात आणि मूल्यांमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. फास्ट फूड, जंक फूड, प्रक्रिया केलेले खाद्य पदार्थ यांचा वाढता वापर आरोग्याच्या दृष्टीने धोकादायक ठरत आहे. स्थूलता, मधुमेह, उच्च रक्तदाब अशा 'जीवनशैलीजन्य आजारां'चे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे 'आरोग्यदायी अन्न संस्कृती' विकसित करणे हा देखील जागतिक अन्न दिनाचा एक महत्त्वाचा संदेश आहे. पोषण आणि सुरक्षित अन्न हे मानवाधिकाराशी थेट संबंधित आहे. संयुक्त राष्ट्रांच्या मानवाधिकार जाहीरनाम्यातील कलम २५ नुसार, प्रत्येक व्यक्तीस आपले आणि आपल्या कुटुंबाचे आरोग्य टिकवण्यासाठी आवश्यक अन्न मिळणे हा त्याचा मूलभूत अधिकार आहे. म्हणूनच सरकार, उद्योग, समाजसंस्था आणि सामान्य नागरिक यांना एकत्रितपणे काम करण्याची गरज आहे.

भारतामध्ये आज अन्नधान्याचे उत्पादन वाढले असले तरी त्याचे समान वितरण आणि साठवणूक व्यवस्थापन हे अद्यापही आव्हानात्मक आहे. दरवर्षी लाखो टन धान्य अयोग्य साठवणुकीमुळे वाया जाते. भारतीय अन्न महामंडळ (FCI) च्या अहवालानुसार, सुमारे १० टक्के पर्यंत धान्य उंदीर, आर्द्रता आणि साठवणूक अभावामुळे नष्ट होऊ शकते. ही अन्ननासाडी टाळण्यासाठी आधुनिक शीतगृह आणि शेतकरी उत्पादक कंपनींचे जाळे मजबूत करणे गरजेचे आहे. भुकेचा प्रश्न हा फक्त 'अन्न नसल्याचा' नाही तर 'अन्नाचा गैरवाटप' आणि 'अन्नविषयक धोरणांची असमान अंमलबजावणी' यांचाही आहे. शहरी आणि ग्रामीण, श्रीमंत आणि गरीब, पुरुष आणि महिला यांच्यातील अन्नसुरक्षेतील अंतर कमी करणे हा सर्वात मोठा सामाजिक उद्देश असायला हवा.

जागतिक अन्न दिन हा केवळ उत्सव नसून आत्मपरीक्षणाचा दिवस आहे. आपण किती अन्न वाचवतो, किती नासवतो, आणि किती वाटतो याचा विचार करण्याचा दिवस आहे. आपण 'अन्न दान' आणि 'अन्न संवर्धन' या दोन्ही संकल्पना जीवनात उतरविल्या तरच जागतिक भूकमुक्तीचा स्वप्न साकार होईल. शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि स्थानिक शासन यंत्रणा यांनी अन्नबचतीबाबत जनजागृती मोहिमा राबवाव्यात. अन्न हे जीवन आहे, अन्न हे आरोग्य आहे, आणि अन्न हे मानवतेचे प्रतीक आहे. म्हणूनच, 'अन्नाचा सन्मान करा, अन्नाची नासाडी टाळा आणि अन्नाचे समान वाटप करा' हा संदेश प्रत्येक नागरिकाच्या कृतीतून प्रतिबिंबित झाला पाहिजे. भविष्यातील पिढ्यांसाठी शाश्वत आणि समतामूलक अन्नव्यवस्था उभी करण्यासाठी आज आपण पावले उचलली पाहिजेत. भुकेविरुद्धचा हा लढा केवळ शासनाचा नाही, तर प्रत्येक मानवाचा आहे. कारण भूक कोणालाही विचारत नाही, ती फक्त जाणवते, आणि त्या जाणिवेतूनच जागतिक अन्न दिनाचा खरा अर्थ प्रकट होतो.

# स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णांच्या तब्येतीत झपाट्याने सुधारणा

## ऑन्कोसर्जननी रोबोटिक शस्त्रक्रियेद्वारे कमी इन्व्हेसिव पद्धतीने ब्रेस्ट रिमूव्हल केले

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी :** नवी मुंबई, १५ ऑक्टोबर २०२५: अपोलो हॉस्पिटल्सने स्तनाच्या कर्करोगाने ग्रस्त असलेल्या रुग्णावर यशस्वी उपचार केले. रुग्णावर रोबोटिक-असिस्टेड निपल-स्पेअरिंग मास्टेक्टॉमी करण्यात आली आणि त्यानंतर त्वरित ब्रेस्ट रिकन्स्ट्रक्शन करण्यात आले. एका ५३ वर्षीय महिलेमध्ये आक्रमक स्तन कार्सिनोमाचे निदान झाले होते, ही महिला कोणत्याही गुंतागुंतीशिवाय बरी झाली आणि सर्जरीनंतर दुसऱ्याच दिवशी त्यांना घरी पाठवण्यात आले. या प्रक्रियेत अतिशय लहान चीरा देऊन ट्यूमर काढून टाकला, स्तनाचे नैसर्गिक स्वरूप जपले गेले आणि त्याच शस्त्रक्रियेत ब्रेस्ट रिकन्स्ट्रक्शन देखील करण्यात आले. काही आठवड्यांपूर्वी, या महिलेला तिच्या उजव्या स्तनात गाठ जाणवली. जेव्हा ती नवी मुंबईतील अपोलो हॉस्पिटल्समध्ये आली तेव्हा सुरुवातीच्या



मॅमोग्राम आणि अल्ट्रासाऊंडमध्ये संशयास्पद जखम दिसून आली आणि बायोप्सीने हे आक्रमक स्तन कार्सिनोमा असल्याची पुष्टी केली. निदानावरून असे दिसून आले की शस्त्रक्रिया करणे आवश्यक होते.

सामान्य ओपन मास्टेक्टोमीमुळे त्वचेच्या फ्लॅपवरील दाब बदलतो आणि रिकव्हरीला उशीर लागतो. आम्ही या रुग्णासाठी रोबोटिक-सहाय्यित निप्पल-स्पेअरिंग मास्टेक्टोमीची शिफारस केली. स्तनाचे टिश्यू काढून टाकण्यासाठी एक रॅडिकल मास्टेक्टोमी करण्यात आली. फक्त एका लहान चीरा देऊन, सर्व स्तनाचे टिश्यू काळजीपूर्वक कापले गेले आणि रोबोटिक उपकरणांचा वापर करून काढून टाकले गेले. या रुग्णाला शुद्ध आल्यावर तिच्या स्तनाचा आकार अबाधित असल्याचे लक्षात आले, ज्यामुळे तिची शरीराची प्रतिमा, स्वाभिमान आणि आत्मविश्वास कायम राहिला. कमीत कमी आक्रमक शस्त्रक्रियेमुळे कमीत कमी जखमा झाल्या, हाताची हालचाल कायम राहिली आणि रुग्ण महिला शारीरिक आणि भावनिकदृष्ट्या आपले सामान्य जीवन लवकरात लवकर पुन्हा सुरु करू शकली.

डॉ.नीता नायर, लीड कन्सल्टन्ट-अँड रोबोटिक सर्जरी, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई म्हणाल्या,"रोबोटिक-असिस्टेड निप्पल-स्पेअरिंग मास्टेक्टॉमीचे उद्दिष्ट कर्करोग पूर्णपणे काढून टाकणे आणि सर्जरीच्या खुणा फार जास्त राहू नयेत आणि रुग्णाला आपले सामान्य जीवन लवकरात लवकर पुन्हा सुरु करता यावे हे आहे. रिकन्स्ट्रक्शनमुळे महिलांना चांगली शारीरिक प्रतिमा राखण्यात आणि भावनिक रिकव्हरीमध्ये मदत होते. या केसमध्ये, आम्ही एकाच शस्त्रक्रियेमध्ये संपूर्ण रोग काढून टाकला, स्तनाग्र, त्वचा जतन केली आणि ब्रेस्ट रिकन्स्ट्रक्शन देखील केले. सेंटिनल लिम्फ नोड नकारात्मक असल्याने, आम्ही अधिक व्यापक ऍक्सिलरी शस्त्रक्रिया देखील टाळली. रुग्ण निरोगी होती आणि डिस्चार्ज मिळाल्यावर तिची शस्त्रक्रियेची जखम देखील बरी होण्याच्या मार्गावर होती. शस्त्रक्रियेनंतर तिची तब्येत काहीही गुंतागुंत न होता सुधारली."

पारंपारिक स्तन मास्टेक्टॉमीच्या तुलनेत, तात्काळ रिकन्स्ट्रक्शनसह हा कमीत कमी आक्रमक दृष्टिकोन अनेक फायदे देतो. पारंपारिक सर्जरीमध्ये ८-१० सेमीचे चिरे द्यावे लागतात, त्यांच्या तुलनेत यामध्ये फक्त ३-४ सेमीच्या लहान चीराने कर्करोग पूर्णपणे काढून टाकता येतो. टिश्यू आणि रक्ताचे नुकसान कमी होते, शस्त्रक्रिया आघात कमी होतो. तात्काळ रिकन्स्ट्रक्शनमुळे मानसिक आघात आणि अनेक शस्त्रक्रियांची आवश्यकता टाळली जाते. रिकव्हरी जलद होते आणि रुग्णांना कमी वेदना होतात, ज्यामुळे ते त्यांच्या सामान्य जीवनात लवकर परत येऊ शकतात. हा दृष्टिकोन स्तनाच्या कर्करोगाच्या प्राथमिक टप्प्यातील रुग्णांसाठी योग्य आहे ज्यांचे ट्यूमर स्तनाग्रांपासून दूर असतात आणि त्यांचा त्वचेवर परिणाम होत नसतो. रुग्णाची निवड काळजीपूर्वक केली गेल्यास प्रगत प्रीऑपरेटिव्ह इमेजिंग सर्वोत्तम परिणाम मिळवून देते.

# शासनाने ठरवून दिलेल्या हमीभावाने सोयाबीन खरेदी करा संभाजी ब्रिगेडचे निवेदन



**दैनिक युवक आधार**

**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

सध्या सुरू असलेल्या खरीप हंगामात त सोयाबीन खरेदी संदर्भात शासनाने जाहीर केलेला यात मोठ्या प्रमाणात तफावत दिसून येत आहे. यामुळे शेतकऱ्याच्या घामाचा किमतीची सरळ सरळ लूट सुरू असल्याचा आरोप संभाजी ब्रिगेडच्या पदाधिकाऱ्यांनी केला असून शासनाने तत्काळ हस्तक्षेप करून सोयाबीनची खरेदी हमीभावाने करण्याची मागणी केली आहे.

संभाजी बी ग्रेडचे तालुका अध्यक्ष रुपेश बाजड पाटील यांच्या सह शेतकऱ्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, सध्या बाजारात सोयाबीनचे भाव ३,५०० ते ४,२०० रुपये प्रति क्विंटल इतके मिळत आहे, प्रशासनाने जाहीर केलेला हमीभाव सुमारे ५३२८ रुपये आहे. या तफावतीमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. व्यापाऱ्यांकडून आणि दलालाकडून मनमानी दर ठरवून शेतकऱ्यांना फसवले जात असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शेतकरी हा देशाचा कण आहे. त्याच्या उत्पादनाची योग्य किंमत मिळणे ही शासनाची जबाबदारी आहे. मात्र शासनाने वेळोवेळी दिलेल्या हमीभावाच्या घोषणा केवळ कागदावरच राहिला असून प्रत्यक्षात बाजारात शेतकऱ्याना न्याय मिळत नाही. त्यामुळे राज्यातील सर्व खरेदी केंद्रावर तत्काळ सोयाबीनची खरेदी हमीभावाने सुरू करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. संभाजी बी ग्रेडच्या या निवेदनाची प्रत तहसीलदार, कृषी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना देण्यात आली असून मागणी तातडीने मान्य न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

यावेळी संभाजी बी ग्रेडचे जिल्हाध्यक्ष अर्जुन पाटील खरात तालुका अध्यक्ष रुपेश पाटील बाजड जिल्हा कार्याध्यक्ष दीपक पाटील शेवाळे जिल्हा उपाध्यक्ष विनोद पाटील बोडखे येथील सरपंच शेषनारायण कोकाटे, गणेश पुर येथील विष्णू पाटील जाधव देवराव बाजड प्रभाकर पाटील यांच्यासह शेकडो शेतकरी उपस्थित होते.

# सिपोरा (अं) गटामधून जिल्हा परिषद निवडणूक लढवण्यासाठी इच्छुक - सौ भारती मधुकर गोफणे

**दैनिक युवक आधार**

**जाफराबाद टेंभूर्णी प्रतिनिधी:- अनिल ससाने**

जाफराबाद जिल्हा जालना सिपोरा (अं) जिल्हा परिषद गटामध्ये SC महिला राखीव असल्याने गेल्या बऱ्याच वर्षापासून भाजपच्या निष्ठावंत कार्यकर्त्या म्हणून ओळख असलेल्या भातोडी येथील विद्यमान सरपंच सौ.भारती मधुकर गोफणे यांनी भातोडी गावात अनेक विकास कामे केली आहे सिपोरा (अं)गटात जिल्हा परिषद सदस्यासाठी अनुसूचित जाती महिला आरक्षित असल्यामुळे त्यांनी उमेदवारीसाठी भाजपाला आग्रह धरला आहे जेणेकरून संपूर्ण सर्कलमध्ये विकास करता येईल भातोडी येथील सौ. भारती मधुकर गोफणे भाजप पक्षाच्या विविध



कामासाठी अग्रेसर असतात एक उच्च शिक्षित महिला सरपंच म्हणून तालुक्यामध्ये भाजप पक्षाकडे त्यांची नोंद आहे गोरगरीब जनतेसाठी शेतकऱ्यासाठी वृद्धांसाठी त्या नेहमी झगडत असतात विकासशील महिला सरपंच यांनी जिल्हा परिषद सिपोरा(अं)या गटामधुन उमेदवारीसाठी इच्छा दर्शविली आहे

**"मनोगत"**

मा. केंद्रीय रेल्वेमंत्री रावसाहेब पाटील दानवे जाफराबाद भोकरदन मतदार संघाचे आमदार तथा पंचायतराज सदस्य मा. संतोषभाऊ दानवे यांनी मला जिल्हा परिषद सदस्यासाठी संधी दिली तर नक्कीच मी दादा आणि भाऊ यांच्या माध्यमातून सिपोरा(अं) गटाचा विकास केल्याशिवाय राहणार नाही

-सौ.भारती मधुकर गोफणे-
विद्यमान सरपंच भातोडी ता.
जाफराबाद जि.जालना

# जासई विद्यालयात वाचन प्रेरणा दिन कार्यक्रम उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**

**जिल्हा प्रतिनिधी प्रमुख/ एम.डी.भोईर**

आज बुधवार दिनांक १५/१०/२०२५ रोजी श्री. छत्रपती शिवाजी हायस्कूल व लोकनेते दि.वा.पाटील ज्युनिअर कॉलेज दहागाव विभाग जासई येथे वाचन प्रेरणा दिन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी विद्यालयाच्या प्राचार्या म्हात्रे के. जी. मॅडम सर्व सेवकवृंद व विद्यार्थी उपस्थित होते.

सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात भारताचे माजी राष्ट्रपती



थोर वैज्ञानिक ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमा निमित्त विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून मनोगते व्यक्त केली. तसेच विद्यालयाच्या प्राचार्य सौ. म्हात्रे के.जी.मॅडम यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून दिले आणि दररोज वाचन करण्याचे आवाहन केले.

या कार्यक्रमानिमित्त विद्यालयात निबंध स्पर्धा हस्ताक्षर स्पर्धा वक्तृत्व स्पर्धा इ.यांचे आयोजन करण्यात आले होते.

हा कार्यक्रम यशस्वीरित्या होण्यासाठी आपल्या विद्यालयाचे ग्रंथपाल श्री.श्रीराम ठाकूर सर यांनी विशेष मेहनत घेतली तसेच विद्यालयातील सर्व सेवकांचे सहकार्य मिळाल्यामुळे कार्यक्रम यशस्वीरित्या संपन्न झाला.

# नो पार्किंग झोनमध्ये पार्क केलेल्या वाहनांवर कारवाई



**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर**

सीवूड्समधील वाहतूक पोलिसांनी नो-पार्किंग झोनमध्ये पार्क केलेल्या वाहनांवर कारवाई केली. नवी मुंबईतील सीवूड्समध्ये नो-पार्किंग झोनमध्ये पार्क केल्याबद्दल सुमारे ७० वाहनांना दंड ठोठावण्यात आला. प्रत्येक वाहनाला ऑनलाइन दंड ठोठावण्यात आला. दंड आकारण्यापूर्वी, वाहतूक पोलिसांनी मालकांना त्यांची वाहने काढून टाकण्याचे आवाहन करणारी घोषणा केली. त्यानंतरही, जेव्हा लोक त्यांची वाहने घेऊन निघून गेले नाहीत, तेव्हा त्यांच्यावर ऑनलाइन दंड आकारला.

याप्रसंगी बोलताना नेरुळ वाहतूक विभागाच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक मोहिनी लोखंडे म्हणाल्या की, लोक कुठेही निष्काळजीपणे त्यांची वाहने पार्क करतात, ज्यामुळे वाहतूक कोंडी होते आणि कधीकधी अशा पार्किंगमुळे रस्ते अपघात होतात. म्हणूनच, आम्ही सीवूड परिसरातील अनेक ठिकाणी "नो पार्किंग" चे फलक लावले आहेत. लोक त्यांची वाहने थोड्या वेळासाठी पार्क करतात आणि नंतर तासन्तास वाहने काढत नाहीत, ज्यामुळे स्थानिक रहिवाशांची मोठी गैरसोय होते. ७० चारचाकी वाहनांवर कारवाई करण्यात आली आहे. भविष्यात ही समस्या सोडवली नाही तर आणखी कडक कारवाई केली जाईल, ज्यामध्ये वाहन जप्तीचा समावेश असू शकतो. असे यावेळी सांगण्यात आले.

# धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्त भिमगड येथे वर्ष ५ वा धम्मचक्र वर्धापन दिन साजरा

**दैनिक युवक आधार**

**प्रतिनिधी योगेश चौदंते**

मुदखेड दि १४ऑक्टोबर १९५६धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या ६९ व्या वर्धापन दिनानिमित्त भिमगड येथे वर्ष ५ वा धम्मचक्र वर्धापन दिन उत्साहात व शोभिवंत वातावरणात मोठ्या श्रद्धाभावाने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान वंदनीय भंते गगन बोधी यांनी भूषविले.

कार्यक्रमाची सुरुवात पंचशील धम्म ध्वजारोहणाने करण्यात आली. वंदनीय भंते गगन बोधी यांच्या शुभहस्ते धम्मध्वज फडकविण्यात आला. त्यानंतर त्यांनी उपस्थित धम्म उपासक-उपासिका यांना त्रिशरण व पंचशील देत जनमानसात करुणा, मैत्री, समता व बंधुतेचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या निमित्ताने धम्मदीक्षा घेतलेल्या कोट्यवधी भारतीयांच्या ऐतिहासिक परंपरेला स्मरून डॉ. बाबासाहेब



आंबेडकरांच्या महान कार्यास अभिवादन करण्यात आले. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या महत्त्वावर प्रकाश टाकताना भंते गगन बोधी म्हणाले की, “धम्म हा मानवी जीवनाचा मार्ग आहे. धम्म म्हणजे शांती, नैतिकता आणि मानवतेचा खरा मार्गदर्शक आहे.”

स्थानिक बुद्ध विहार परिसरात विविध धार्मिक उपक्रम, बौद्ध वचने पठण, बुद्ध वंदना तसेच सामूहिक प्रार्थना यांचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमानंतर अभ्यागतांसाठी महाप्रसादाचेही आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने धम्म अनुयायी, सामाजिक कार्यकर्ते, महिला, युवक आणि ज्येष्ठ नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी समिती सदस्यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रम स्थळी शिस्तबद्ध व्यवस्था, धम्मदर्शन फलक, निळ्या पताका आणि जयभीम घोषणांनी परिसर दुमदुमला होता.

# जरेवाडीतील आगीत खामकर यांच्या घराची झाली राख, भाऊसाहेब आणणा भवर बनले आधाराचा हात!

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा(प्रतिनिधी)** : जरेवाडी गावात हनुमान खामकर यांच्या राहत्या घराला लागलेल्या आगीत काही क्षणांतच सर्व काही जळून खाक झाले. कष्टाने उभारलेले घर, संसाराचा प्रत्येक कोपरा क्षणभरात राखेत परिवर्तित झाला. डोळ्यांसमोर आयुष्यभराची जमा-पूंजी जळताना पाहून खामकर कुटुंबाचे डोळे अश्रूंनी भरून आले. या दुःखाच्या काळात अंमळनेर जिल्हा



परिषद गटाचे नेते भाऊसाहेब आणणा भवर यांनी गावात येऊन जळीतग्रस्त कुटुंबाला भेट दिली. त्यांनी आधाराचा हात देत मनापासून दिलासा दिला. त्यांच्या चेहऱ्यावरची माया आणि आपुलकी पाहून कुटुंबातील प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रूंऐवजी कृतज्ञतेचे पाणी दाटले. भाऊसाहेब आणणा भवर यांनी संकटग्रस्त कुटुंबाला ₹२१,०००/- ची आर्थिक मदत देत माणुसकीचा सुंदर आदर्श घालून दिला. त्यांनी केवळ पैशांनी नव्हे, तर आपल्या उपस्थितीने आणि मनःपूर्वक शब्दांनी जखमी मनांना मलम लावले.“आगीत आमचं सर्व काही गेलं, पण भाऊसाहेबांनी दिलेला आधार आम्हाला नवसंजीवनी देऊन गेला,” असे अश्रूंनी भरलेल्या डोळ्यांनी खामकर यांनी सांगितले. गावकऱ्यांनी एकमुखाने म्हटलं “संकटात माणसाची ओळख होते... आणि भाऊसाहेब आणणा भवर यांनी खरी माणुसकी दाखवली!”

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# घरकुल ते वास्तुविहार नवीन बससेवा सुरु करण्याची शिवसेना( उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाची मागणी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर):**

खारघर सेक्टर १५ ते १८ परिसरातील नागरिकांना खारघर रेल्वे स्थानक गाठण्यासाठी बस क्रमांक ५३ व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रकारची वाहतूक सुविधा नसल्यामुळे गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे नवी मुंबई महापालिका परिवहन विभागाकडून खारघर रेल्वे स्थानक ते वस्तूविहार या मार्गावर नवीन बस सुरू करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खारघर उपशहर प्रमुख नंदू वारुंगसे यांनी आगार व्यवस्थापकाकडे केली आहे.

खारघर सेक्टर १५ ते १७ मध्ये सिडकोने घरकुल, स्पॅगेटी, वास्तुविहार, सेलिब्रेशन आदी गृहसंकुले उभारली आहेत. तसेच सेक्टर १८ परिसरात जवळपास चार हजार नागरिक वास्तव्य करीत आहे. शिवाय या परिसरात चार शाळा आहेत. या भागात नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन विभागाकडून एनएमएमटीची ५३ क्रमांकाची एकमेव बस सेवा सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे इतर कोणताही पर्याय नसल्याने नागरिकांना पायी जावे लागते. तर खारघर टोल नाका येथील बस थांबा गाठावे लागते. तसेच ५० ते ६० रुपये भाडे देऊन खारघर रेल्वे स्थानक गाठावे लागत असल्यामुळे नंदू वारुंगसे यांनी नवी मुंबई महापालिकेच्या परिवहन सेवेचे तुर्भे आगारचे व्यवस्थापक सुनील जगताप यांची भेट घेऊन येथील मार्गावर नवीन बस सुरू करण्याची मागणी केली आहे. दरम्यान जगताप यांनी लवकरच या मार्गावर बससेवा सुरू करण्यात येईल, अशी ग्वाही दिल्याचे नंदू वारुंगसे यांनी सांगितले.

# काँग्रेसच्या लढ्यानंतर अहिल्यानगर-संभाजीनगर महामार्ग दुरुस्तीला प्रारंभ

## आंदोलनाच्या यशाचे जिल्हाभरातून स्वागत

**दैनिक युवक आधार**
**नेवासा प्रतिनिधी:- लखन वाल्हेकर**

**अहिल्यानगर** - छत्रपती संभाजीनगर महामार्गाची खड्डे पडून झालेली दुरावस्था, खड्ड्यामुळे महामार्गाची अक्षरशः झालेली चाळण, प्रशासनाचे दुर्लक्ष याविरोधात काँग्रेस पक्षाने आक्रमक लढा देत जागतिक बँकेच्या कार्यकारी अभियंताच्या कार्यालयास टाळे ठोकत धरणे आंदोलन करत तातडीने महामार्ग दुरुस्ती करण्याची मागणी केली होती. काँग्रेसच्या आक्रमक आंदोलनाच्या लढ्यास आज यश मिळाले आहे. अहिल्यानगर-संभाजीनगर महामार्गाची खडी व डांबरीकरणाने खड्डे बुजवून दुरुस्ती सुरु करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून खड्डे बुजविण्यासाठी तब्बल तीन कोटीची निविदा काढून वर्क ऑर्डर देखील काढण्यात आल्या असून



अहिल्यानगर ते इमामपूर, इमामपूर ते घोडेगाव, घोडेगाव ते वडाळा अशा तीन टप्प्यात महामार्गाच्या दुरुस्ती कामास सुरुवात देखील करण्यात आली.

कामास प्रारंभ केल्यानंतर आज महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे संभाजी माळवदे तसेच काँग्रेस कमिटीच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः दुरुस्ती कामाची पाहणी केली यावेळी कामाची गुणवत्ता राखण्याबरोबरच दुरुस्ती काम जोरात करण्यासाठी तीन युनिटमध्ये वाढ करून पाच युनिटद्वारे काम सुरु करावे व दीपावली पूर्वी पूर्ण खड्डे बुजविण्यात यावे अशी मागणी उपभियंता यांच्याकडे करण्यात आली. यामुळे महामार्गाचे लवकरात लवकर काम पूर्ण होण्यास मदत होणार असून प्रवासी नागरिकांना खड्यामुळे होणारा मानसिक त्रास कमी होणार आहे तसेच अपघाताचे प्रमाण देखील कमी होईल. याशिवाय प्रवासाला कमी वेळ लागेल. तर दिवाळी सुट्टीमध्ये प्रवाशांचे होणारे हाल थांबतील.यामुळे या महामार्गावर प्रवास करणाऱ्यांना नक्कीच दिलासा मिळाला आहे. काँग्रेसच्या भूमिकेचे जिल्ह्याभरातून नागरिकांनी स्वागत केले आहे.यावेळी छावाचे प्रदेशाध्यक्ष रावसाहेब काळे, काँग्रेस शहराध्यक्ष अंजुम पटेल, बसपाचे युवा नेते हरीश चक्रनारायण,काँग्रेसचे संदीप मोटे, सुमित आदी उपस्थित होते.

> "आता लढा मनमाड मार्गावरील वळवलेली वाहतूक बंद करण्यासाठी" नागरिकांच्या प्रश्नासाठी काँग्रेसने सदैव आक्रमक भूमिका घेत प्रश्नांची सोडवणूक केली आहे. महामार्गाचे काम सुरु झाल्याने समाधान वाटले परंतु आता लढा मनमाड महामार्गाची वाहतूक अहिल्यानगर - संभाजीनगर महार्गांवर वळविली आहे ती बंद करण्यासाठी. लवकरच यासाठी रास्ता रोको करून ही वाहतुक बंद करणार
> - संभाजी माळवदे, प्रदेश काँग्रेस कमिटी.

> प्रशासनाला नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा कोणताही अधिकार नाही. काँग्रेसने घेतलेली भूमिका ही योग्य असून तिचे आम्ही स्वागत करतो मनमाड महामार्गाची वळवेलेली वाहतूक बंद करण्यासाठी मैदानात उतरणार
> - रावसाहेब काळे, अध्यक्ष छावा संघटना.

# कामोठे येथे वृक्षारोपण कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(वार्ताहर) :**
कामोठे वसाहतीतील निसर्गप्रेमी संघटनेकडून वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी वृक्षसंवर्धनाबाबत अध्यक्ष सुनील करपे यांनी मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमाला निसर्ग प्रेमी संस्था कामोठेचे अध्यक्ष सुनिल करपे, कामोठे पोलिस स्टेशनच्या वरिष्ठ पोलिस निरीक्षक विमल बिडवे, पोलिस निरीक्षक पगारे, जय पावणेकर, राजाराम पाटील, समाजसेविका शुभांगी खरात, सुरेश खरात, पंकज पाटील, रवी गोवारी आदी उपस्थित होते. यावेळी विविध प्रजातीच्या आंबा, जांभूळ, कडुलिंब, सुपारी, बहावा, तुती, बोगनविलिया, पारिजात, बेगम बहार आदी वृक्षारोपण करण्यात आला.

# आयफोन मोबाईल चोरी प्रकरणी आणखी दोन आरोपींवर कारवाई

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (वार्ताहर)**

आयफोन मोबाईल चोरी प्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी आणखी दोघांवर कारवाई करून आयफोन मोबाईल हस्तगत केले आहेत

पनवेल ओरीयन मॉल पनवेल येथील आय प्लॅनेट मोबाईल दुकानात काम करणारा आरोपी नामे अशोक घराई यांने खोटी व बनावट बिल तयार करून दुकाणातुन एकुण ९ आयफोन १६ पो मॅक्स, रूपये १२,३७,७४०/-रू. किमतीचे फसवणुक करून घेवून गेला होता त्याबाबत पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. याबाबत वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरक्षक हजरत पठाण, पोहवा बंटी कुडावकर, पौषी साईनाथ मोकळ, पोशी काकडे आदींच्या पथकाने गुप्त बातमीद्वारे आणि तांत्रिक तपासद्वारे अधिक शोध घेत सदर गुन्हयातील मधिल मुख्य आरोपी अशोक जोतीश घराई यास ओडीसा येथुन अटक केली असुन त्याचा दुसरा साथीदार रजत रामआचल सिंग (वय-२९) अटक करून ५ आय फोन मोबाईल जप्त करण्यात आले होते. त्यानंतर अधिक तपास करून तिसरा साथीदार विशाल कपुरचंद दोशी (वय-४२) ताडदेव, मुंबई यास अटक करून त्याचे कडून गुन्हयातील चोरी केलेल्या ०९ मोबाईल पैकी उर्वरीत ०४ आय फोन १६ प्रो. मॅक्स जप्त करून एकुण १० टक्के मालाची जप्ती करण्यात आली आहे.

# पत्रकार सिद्धार्थ धंदरे यांना कृती गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**दैनिक युवक आधार**
**वाशिम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**

चिखली (बुलढाणा ) पत्रकार श्री. सिद्धार्थ धंदरे यांना पत्रकारिता क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल कृती गौरव राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांना पत्रकारिता व सामाजिक क्षेत्रात कामगिरीबद्दल अनेक पुरस्कार मिळालेले आहे.ते युवा ग्रामीण पत्रकार संघ बुलढाणा जिल्हाध्यक्ष असून दादासाहेब फाळके युनियन बुलढाणा जिल्हा सचिव आहेत बी.एस.एफ. बहुद्देशीय संस्था अपेक्षित नायक न्यूज व संकल्प बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने कृती गौरव पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.




हा पुरस्कार सोहळा बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे होणार असून सामाजिक साहित्यिक पत्रकारिता कला अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांना कृती गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.हा पुरस्कार सोहळा सामाजिक क्षेत्रातील व पत्रकार क्षेत्रातील दिग्गज लोकांच्या उपस्थितीमध्ये हा सोहळा पार पडणार आहे.अपेक्षित नायक न्यूज मुख्य संपादक भूषण सरदार यांनी अशी ही माहिती दिली आहे.

# एक नवा अध्याय रुणांचा...!

**प्रतिनिधी/ सेलू**
**शिवाजी पवार**

तालुक्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लवकरच होणार आहेत. त्याच अनुषंगाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून अनेक दिग्गज निवडणुकीच्या आखाड्यात उतरण्यासाठी तयार झाले आहेत.

या मध्ये नव्या दमाचे उत्साही तरुण कार्यकर्ते देखील निवडणुकीला सामोरे जाण्याची तयारी करताना दिसत आहेत.यात कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसलेले सर्वसामान्य घरातून येणारे अनेक तरुण चेहरे, निवडणुकीत पक्षाकडून संधी मिळेल या अपेक्षेत आहेत.परंतु राजकारणाची झालेली दुकानदारी पाहता,पक्ष नेतृत्व नव्या कोऱ्या चेहऱ्यांना संधी देईल का,हे पाहणे देखील औत्सुक्याचे ठरेल.

अनेकदा बोलले जाते की तरुणांनी राजकारणात यायला हवं,पण राजकारणात येऊन पण,

परंपरागत व प्रस्थापित राजकीय नेत्यांच्या यादीत,नवीन तरुणांना संधी मिळेल याची शाश्वती तशी कमीच असते.सर्वसामान्य घरातून येणाऱ्या तरुण कार्यकर्त्यांना पक्ष नेतृत्वाकडून डावलले जाते हे आपण नेहमी पाहत असतो.सामान्य कुटुंबातील तरुण ज्यांच्या मध्ये लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी लोकांसाठी काम करण्याची इच्छा असताना देखील, ते नवीन तरुण संधी अभावी राजकारण आणि समाजकारण यापासून दूर जाताना दिसतात.नवीन तरुण राजकारणात येऊ शकतं नाहीत किंवा, राजकारणापासून दूर जातात याला जबाबदार कोण?

हे जर आपण पाहायला गेलो तर एक गोष्ट प्रार्मुख्याने जाणवते ती म्हणजे,सध्याचे राजकारण हे आर्थिक बाजू सक्षम असणाऱ्यांचे आहे.पण या सर्वांमध्ये एक गोष्ट अधोरेखित करण्यासारखी आहे,

सामान्य जनतेत मात्तबर व परंपरागत राजकीय नेत्यांच्या बाबतीत खूप काही चांगली भावना दिसत नाही.यामुळेच नवीन सुशिक्षित तरुणांना जर संधी मिळालीच तर,ते ह्या परंपरागत प्रस्थापित राजकारणाची चौकट मोडून काढतील असा सूर सामान्य जनतेत पाहायला मिळतो.पण अशी हिम्मत करणाऱ्या तरुणांच्या मागे खरच लोक उभे राहतात का? प्रस्थापित नेते ज्यावेळी साम दाम दंड भेद वापरून नवीन नवीन तरुण नेतृत्वाला संपवण्याचा प्रयत्न करतील त्यावेळी जनतेतून किती साथ मिळेल आणि राजकीय नेते अश्या तरुणांच्या मागे खरच उभे राहतील का का? असे एक नाहीतर अनेक प्रश्न आहेत ज्यांची उत्तर येणाऱ्या काळातच मिळतील.

पण या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमुळे राजकारणात भविष्य पाहणाऱ्या तरुणाच्या आशा पल्लवित झाल्याचे पाहायला मिळत आहे...

# आदिवासी शक्ती सेनेचा निवडणूक आयोग आरक्षण सोडत पद्धतीवर हरकत अर्ज दाखल

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी- कृष्णा गायकवाड**

पिंपळगाव बसवंत -14 ऑक्टोबर 2025 रोजी आदिवासी आरक्षण संदर्भात स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका 2025 योग्य आरक्षण पडताळणी कामे करण्यात आलेली असल्यामुळे संबंधित विषयी निगडीतिता असलेली माहिती अर्जदारास उपलब्ध करून देण्यात यावी?

आगामी होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य निवडणूक आरक्षण नुकतेच जाहीर झाले परंतु काही जिल्हा परिषद गटा मध्ये 50% वरती आदिवासी समाजाची लोकसंख्या असूनही त्या गटांमध्ये आदिवासी समाजाला जिल्हा परिषद गटातील एकही जागा अनुसूचित जमातीसाठी राखीव झाली नाही.

**अनुसूचित जमातीसाठी जिल्हा परिषद गटात प्रतिनिधित्व मिळावे .?**

नाशिक जिल्ह्यातील आगामी होऊ घातलेल्या 2025 च्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची आरक्षण सोडत पद्धत राखीव प्रवर्गासाठी एससी आणि एसटी एकूण किती गट आणि गण निफाड तालुक्यातील आरक्षित झालेले आहेत तसेच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका 2025 नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यातील राखीव प्रवर्गासाठी एससी आणि एसटी प्रवर्ग चक्राकार पद्धतीने लोकसंख्येच्या प्रमाणात ठेवण्यात आलेले गट व गण त्यांचे नियम अटी व शर्ती असा संपूर्ण माहिती देण्यात यावी? तसेच आक्षेप घेण्यास ठरवून दिलेल्या कालावधी आक्षेप घेणार या अधिकाऱ्याचा संपूर्ण पत्ता यासह माहिती देण्यात यावी.

अश्या विविध प्रश्नांसाठी आदिवासी शक्ती सेना संस्थापक अध्यक्ष श्री अर्जुन भाऊ गांगुर्डे,आकाश कराटे, दिगंबर भोई, रावसाहेब साताळे यांनी मा जिल्हाधिकारी यांचे कडे हरकत अर्ज दाखल केला आहे.


# भाजपतर्फे 'दिवाळी संध्या' सांस्कृतिक सुरेल मैफिलचे आयोजन ; गायन क्षेत्रातील दिग्गजांच्या सुरेल गायनाचा आस्वाद

## राष्ट्रीय पुरस्कार विजेती सुप्रसिद्ध गायिका आर्या आंबेकर, सुप्रसिद्ध गायक स्वप्नील बांदोडकर यांच्यासह अनेक गायकांच्या सुरेल मैफिली

**दैनिक युवक आधार**
**पनवेल(प्रतिनिधी)**

सुश्राव्य गाण्यांची सुरेल मैफिल असलेल्या 'दिवाळी संध्या' या सांस्कृतिक मेजवानीचे दरवर्षीप्रमाणे यंदाही लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टीतर्फे खारघर, कळंबोली आणि कामोठे परिसरात भव्य आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमधून गायन क्षेत्रातील दिग्गज कलाकारांच्या सुरेल गायनाचा मनमोहक आस्वाद रसिकांना मिळणार आहे.

खारघर भाजपच्यावतीने शनिवार दिनांक १८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता खारघर मधील गावदेवी मैदानावर तर रविवार दिनांक १९ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ०७वाजता रोडपाली बस डेपो सेक्टर १६ कळंबोली येथे होणाऱ्या दिवाळी संध्या कार्यक्रमात राधा हि बावरी फेम



सुप्रसिद्ध गायक स्वप्निल बांदोडकर, गायक के. शिरीष, गायिका गुल सक्सेना आणि सपना हेमन या प्रसिद्ध गायकांचे गायन सादरीकरण होणार आहे. तर कामोठे भाजपच्या वतीने बुधवार दिनांक २२ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ७ वाजता लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालय सेक्टर ६ कामोठे येथील दिवाळी संध्या कार्यक्रमात राष्ट्रीय पुरस्कार विजेती सुप्रसिद्ध गायिका आर्या आंबेकर यांची सुश्राव्य गायनाची सुरेल मैफिल अनुभवायला मिळेल. भाजपतर्फे दरवर्षीप्रमाणे दिवाळी सणाच्या निमित्ताने संगीत, संस्कृती आणि कलेचा संगम साधणारी ही 'दिवाळी संध्या' रसिकांसाठी खऱ्या अर्थाने सांस्कृतिक मेजवानी ठरणार आहे. या कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून संगीताचा आनंद घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# वंचित बहुजन आघाडी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका लढणार स्वबळावर - महेश तिडके

**दैनिक युवक आधार**
**रिसोड प्रतिनिधी रणजितसिह.ठाकूर..**

रिसोड नगर परिषद अध्यक्षपदासाठी ३ ते ४ इच्छुकांनी लावली नावे.

राजकारणात युती,आघाड्या, पक्ष बदल आणि नेत्यांचे निर्णय नेहमीच चर्चेत असतात, मात्र काही पक्ष आपल्या ध्येयावर ठाम राहून 'एकला चलो रे' ची भूमिका घेतात.याच धर्तीवर, वाशीम जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात वंचित बहुजन आघाडीने एक महत्त्वपूर्ण आणि ठाम निर्णय घेतला आहे. पक्षाचे तालुका अध्यक्ष महेश तिडके यांनी जाहीर केले आहे की, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुकांमध्ये वंचित बहुजन आघाडी स्वबळावर निवडणूक लढणार आहे. हा निर्णय रिसोडच्या राजकीय पटलावर नवा संघर्ष निर्माण करणारा आहे.

रिसोड तालुक्यात जिल्हा परिषदेचे नऊ आणि पंचायत समितीचे अठरा असे एकूण २७ गण आहेत, तसेच रिसोड नगर परिषदेमध्ये अकरा प्रभागांतून २३




जागांसाठी ही निवडणूक लढवली जाईल.वंचित बहुजन आघाडीने या सर्व जागांवर आपले उमेदवार रिंगणात उतरवण्याची तयारी केली आहे. पक्षाचे तालुका अध्यक्ष महेश तिडके यांनी ही भूमिका अतिशय स्पष्टपणे मांडली आहे. त्यामुळे,इतर पक्षांच्या गणितांवर याचा मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

रिसोड नगर परिषदेच्या अध्यक्षपदासाठी पक्षात कमालीची चुरस असून,सध्या अध्यक्षपदा साठी ३ ते ४ इच्छुक उमेदवार तयारी करत आहेत.मागच्या निवडणुकीत भारिप बहुजन महासंघाचे उमेदवार नंबर २ वरती राहिले होते.आता नगर अध्यक्ष पदासाठी काही इच्छुकांनी आपली नावे पक्षश्रेष्ठींकडे नोंदवली आहेत. यामुळे,केवळ सदस्यच नव्हे तर अध्यक्ष पदासाठीही पक्षांतर्गत जोरदार रस्सीखेच सुरू झाली आहे.महेश तिडके यांनी या निवडणुकीसाठी पक्षाची पूर्ण ताकद पणाला लावण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.स्थानिक पातळीवर पक्षाचे संघटन मजबूत करून जनतेचा विश्वास संपादन करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे.

# इमारत बांधकाम अर्थिक विवंचनेत कामगारांची दिवाळी गोड करावी :- हमीदखान पठाण

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा(प्रतिनिधी)-** बीड जिल्ह्यातील अतिवृष्टीमुळे सर्वत्र थैमान घातले असताना सर्व कामधंदे बंद असल्याने इमारत बांधकाम कामगार हे अर्थिक विवंचनेत सापडला आहे. दिवाळी सण कसा साजरा करावा हा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. सरकारने या कामगारांना दिवाळीसाठी अर्थिक मदत करुन दिवाळी गोड करावी अशी मागणी पत्रकार तथा समाजसेवक हमीद खान पठाण यांनी ईमेल व्दारे केली आहे. राज्यात गेल्या चार महिन्यांपासून अतिवृष्टीमुळे कमी जास्त प्रमाणात धुमाकूळ घातला होता सर्वत्र पूर परिस्थिती निर्माण झाल्याने बीड जिल्ह्यात अधिकच्या पावसाने थैमान घातले आहे. त्या मुळे बीड जिल्ह्यातील बांधकामे कधी चालू तर कधी बंद होती. त्यात वाळु बंद सततच्या पावसामुळे रोजंदारी मजुर हाताला काम नसल्यामुळे या मुळे इमारत बांधकाम कामगार आर्थिक अडचणीत सापडला आहे. सध्या अनेक या मुळे इमारत बांधकाम कामगार कल्याण मंडळाच्या माध्यमातून सरकारने गोरगरिबांची दिवाळी गोड करावी अशी मागणी पेंटर तथा पत्रकार हमीदखान पठाण यांनी केली आहे.



# जिल्हा परिषद मल्हारवाडी येथील शाळेतील बदली झालेल्या शिक्षकांचा निरोप समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :-योगेश पालोदकर**

**सिल्लोड :-** दिनांक 14/10/2025 रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मल्हारवाडी केंद्र पालोद येथे शाळेतून बदली झालेले शिक्षक कैलास समिंद्रे आणि सर्जेराव पेंटलवाड यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमासाठी सुरडकर साहेब (केंद्रप्रमुख), सपकाळ डी. आर.(केंद्रिय मु.अ.), बागुल एस.एस. ( मु.अ.पालोदवाडी), दादाराव सोनवणे (मु.अ.जुनापाणी), रामचंद्र सपकाळ (शा. व्य.स.अ.मल्हारवाडी) यांची उपस्थिती होती.



राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. शाळेतर्फे सर्व पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर बागुल सर यांनी मनोगत व्यक्त केले. सरांनी सांगितले की, कशा प्रकारे शाळेची सुरुवात झाली, किती बिकट परिस्थितीत समिंद्रे सरांनी इथे तब्बल 22 वर्षे सेवा दिली आणि शाळा अगदी छान प्रकारे सांभाळली,जपली,सुस्थितीत ठेवली. समिंद्रे सरांचे शाळेसाठी असलेले योगदान खूप मोठे आहे असे सांगितले. यानंतर शा.व्य. स.अ.रामचंद्र सपकाळ यांनी मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले मी सरांचा विद्यार्थी होतो, आता माझी मुलगी त्यांची विद्यार्थिनी आहे. सरांनी शाळेसाठी खूप काही केलं, सुरुवातीला कुडाच्या भिंतीत शाळा भरायची तेव्हा त्यांनी स्वतः घरून शाळेसाठी पत्रे आणली, जुन्या आठवणी सांगताना त्यांना अगदी गहिवरून आले. या नंतर पेंटलवाड सरांनी मनोगतात सांगितले की, माझा कमी कार्यकाळ राहिला या शाळेवर पण खूप चांगला राहिला. यानंतर अध्यक्षीय भाषणात सपकाळ सरांनी दोघांनाही शुभेच्छा दिल्या आणि शाळेचा पट वाढविण्यासाठी मदत करण्याचे पालकांना आवाहन केले. शाळेतर्फे दोघांनाही भेटवस्तू देण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सरस्वती पालोदकर यांनी केले तर आभारप्रदर्शन संजय मोरे यांनी केले. पेंटलवाड सरांनी आणलेल्या खाऊचे मुलांना वाटप करण्यात आले व कार्यक्रमाची सांगता झाली.

# वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल :**

निसर्गप्रेमी संस्था कामोठेचे अध्यक्ष सुनील करपे यांच्या वाढदिवसानिमित्ताने कामोठे सेक्टर 20 उद्यान येथे वृक्षारोपण कार्यक्रम राबवण्यात आला. सुनील करपे यांच्या वाढदिवसानिमित्ताने वृक्षारोपण करण्याचे आवाहन सोशल मीडियाद्वारे करण्यात आले होते. यावेळी कामोठे पोलीस स्टेशनच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे, त्यांचे सहकारी कामोठे महोत्सवचे प्रमुख एडवोकेट जय पावणेकर, शुभांगी खरात, सुरेश खरात, सागर पाटील, रवी गोवारी, पंकज पाटील आणि परिसरातील इतर नागरीक वृक्षारोपण करतेवेळी उपस्थित होते. यावेळी विविध प्रजातीचे आंबा, जांभूळ, कडूलिंब, सुपारी इत्यादी झाडे लावण्यात आली.

# दैनिक युवक पत्रकार रशीद शेख समाज सेवक यांची कल्याण तालुक्यातील पोलिस मित्र नियुक्ती करण्यात आली आहे

**दैनिक युवक आधार**

**उल्हासनगर :** रशीद शेख पोलिस मित्र कल्याण तालुक्यातील सदस्य पदी निवड करण्यात आली असून त्यांची निवड पोलिस मित्र ठाणे जिल्ह्याचे अध्यक्ष राजेश भांगे साहेब यांनी केली आहे.

पोलिस मित्र क्राईम सेंट्रल ऑण्ड इंटरनॅशनल ह्यूमन राइट्स संघटनेच्या रशीद शेख दै पत्रकार व समाज सेवक शेख यांची निवड करण्यात आली आहे.




त्यांनी रायते येथील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे प्रसिद्ध प्रमुख पद भुषविले होतें पंधरा वर्षा पासून पत्रकार क्षेत्रातील दांडगा अनुभव समाज सेवक आणि पंधरा राज्य स्तरावर पुरस्कार मिळाले असून त्यांना समाज कार्याचा चांगला अनुभव असल्याने ठाणे जिल्हा अध्यक्ष राजेश भांगे साहेब यांनी कल्याण तालुक्यातील सर्व जबाबदारी बसवून पुढील संघटना वाढीसाठी काम करण्यासाठी

सांगितले आहे.

महाराष्ट्र राज्य अध्यक्ष राजहंस वाढे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस मित्र सदस्य नोंदणीला सुरुवात झाली आहे ठाणे जिल्ह्यातील आगदी जोमात सदस्य नोंदणी चालू आहे

रशीद शेख दै युवक आधार पत्रकार व समाज सेवक हुसेन शेख बहुउद्देशीय समाजिक सेवा संस्था संस्थापक अध्यक्ष महाराष्ट्र राज्य आहे

# बार्न्स महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

भारताचे जेष्ठ शास्त्रज्ञ व माजी राष्ट्रपती 'भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस १५ ऑक्टोवर रोजी बार्न्स महाविद्यालयात 'वाचन प्रेरणा दिवस' म्हणून साजरा करण्यात आला. कॉलेजचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवदास कांबळे यांच्या हस्ते डॉ. कलाम यांच्या फोटोस पुष्पहार अर्पण करण्यात आला.



कॉलेजचे प्राचार्य कल्पेश भोईर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी निबंध स्पर्धा आयोजित करण्यात आली. विदयार्थ्यांच्या मनात वाचनाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने वाचन प्रेरणा दिवस महाविदयालयात संपन्न झाला. पाठयपुस्तकांखेरीज अवांतर वाचन प्रत्येक विदयार्थ्याने करावे. अवांतर वाचनामुळे वेगवेगळे संदर्भ, माहिती विदयार्थ्यांना मिळते. आकलन शक्ती वाढते. चांगले वोलता व लिहीता येत. म्हणून सर्वांनी वाचलेच पाहिजे. 'वाचाल तर वाचाल' चे महत्त्व ग्रंथपाल ज्योती म्हात्रे यांनी विदयार्थ्यांना समजावून सांगितले.

# 'मिसाईल मॅन' डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांना महावितरणचे अभिवादन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी सतीश कडू संपादक नागपूर विभाग**

**नागपूर :** महान शास्त्रज्ञ, द्रष्टे लेखक आणि कोट्यवधी तरुणांचे प्रेरणास्रोत असलेले माजी राष्ट्रपती, भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त आज महावितरणने त्यांना विनम्र अभिवादन केले. भारताच्या तंत्रज्ञान आणि आर्थिक विकासासाठी 20 वर्षांचा कृती आराखडा तयार करणाऱ्या आणि 'मिसाईल मॅन' म्हणून जगभर ओळखल्या जाणाऱ्या डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला महावितरणच्या अधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.महावितरणच्या नागपूर परिमंडलातील काटोल मार्गावरील 'विद्युत भवन' या प्रशासकीय मुख्यालयात हा आदरांजलीचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. मुख्य अभियंता श्री. दिलीप दोडके यांनी डॉ. कलाम यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून अभिवादन केले. यावेळी अधीक्षक अभियंता मंगेश वैद्य, कार्यकारी अभियंता विजय तिवारी, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी सचिन लहाने, प्रणाली विश्लेषक प्रविण काटोले, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर, वरिष्ठ व्यवस्थापक (मानव संसाधन) सुशील विखार यांच्यासह अनेक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी डॉ. कलाम यांच्या कार्याला सलाम केला. डॉ. कलाम यांच्या जीवनमूल्यांचे स्मरण करून त्यांच्या 'स्वप्न बघा आणि ती पूर्ण करा' या संदेशाची आठवण या निमित्ताने करण्यात आली.




माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना अभिवादन करतांना महावितरणचे अधिकारी व कर्मचारी उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण, नागपूर

# मुख्याध्यापक अनिकेत राऊत यांचा निरोप समारंभ संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड:-** तालुक्यातील धावडा येथील जिल्हा परिषद शाळेचे शाळेचे मुख्याध्यापक अनिकेत राऊत यांची बदली झाल्याने अनोखा निरोप समारंभ कार्यक्रम गावकऱ्यांनी सहकार्यानी व विद्यार्थ्यांनी आयोजित केला. धावडा (ता . सिल्लोड ) डोंगर पट्ट्यातील दुर्गम भागात असलेले गाव पहिली ते सातवीपर्यंत जिल्हा परिषद शाळेत अनिकेत राऊत यांनी विद्यार्थ्यांना इंग्रजीचे महत्व पटवून देत पहिलीपासुनच इंग्रजीची गोडी निर्माण व्हावी यासाठी त्यांच्या कौशल्याने विद्यार्थ्यांसाठी शर्थीचे प्रयत्न केले. विद्यार्थ्यांना इंग्रजी येऊ लागल्याने राऊत सर हे सर्वपरिचित झाले व गावातील नागरिकांची नाळ त्यांच्याशी जोडली गेली. 2025 ऑक्टोबर मध्ये त्यांची बदली झाल्याने शाळेतील विद्यार्थी नाराज झाले. दि.9 गुरुवार रोजी त्यांचा निरोप समारंभ आयोजित करण्यात आला. फूलांची उधळण करत रांगोळी काढली, गावातील नागरिकांनी शाल श्रीफळ सन्मानपत्र व भेटवस्तू देऊन त्यांना गौरविण्यात आले.



यावेळी आदर्श शेतकरी अंबादास बनसोड, नारायण इंगळे, योगेश दळवी, भागवत मूरकूटे, मंगेश तायडे, रंगनाथ दिवटे, दिपक दळवी,पप्पू बनकर, विजय जाधव, संदीप इंगळे सहकारी तावरे सर, खरात मॅडम, संत्रे सर, गजभिये सर,गिरी मावशी व अक्षरा तायडे,रोहीनी तायडे, धनश्री मूरकूटे यांनी भाषण केले. निरोप समारंभ वेळी राऊत सर यांनी प्रत्येक विद्यार्थ्यांना पाणी पिण्यासाठी पाणी बाटल्या वाटप करून संवेदनशीलता दाखवली. सूत्र संचालन तावरे सर यांनी केले तर संदीप इंगळे व अनिकेत राऊत यांनी भाषण केले.

# आपल्या सामाजिक कार्यामूळे शहरात परिचित असलेले मनोज हामंद नगरसेवक होणार याची सर्वत्र चर्चा

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

**घाटंजी -** राज्यात सर्वत्र स्थानिक स्वराज्य संस्थेची निवडणूक रणाधूमाळी दिवाळी नंतर सुरु होणार यांचे स्पष्ट संकेत प्रशासनाने दिले आहे तसेच शहरातील प्रभाग रचना व मतदार याद्याही प्रसिद्ध झाल्या असल्याने घाटंजी शहरात गल्ली बोळात,चाय कैंटिंग,पाणपटरी सर्वत्र न.प.निवडणूक चर्चा रंगायला सुरवात झालेली आहे शहरात आपल्या रुग्णसेवा तसेच जनसेवेने लोकांच्या हृदयात आपली वेगळी ओळख निर्माण केलेले मनोज हामंद यांची सर्वत्र चर्चा होतांना दिसत आहे यावेळी कोण्याही परिस्थितीत नगरसेवक म्हणून सभागृहात पाठवायचा निर्धार स्वतः जनतेने केलेला दिसत आहे.



२०१६ मध्ये सर्वात युवा उमेदवार म्हणून मनोज हामंद यांनी प्रभाग क्र.७ मधून आपली किस्मत आजमावली होती अंत्यत अतातटीच्या लढतीत निसटता पराभव स्विकारावा लागला पण यानंतरी खचून न जाता पून्हा जोमाने जनसेवेमध्ये आपल सर्वस्व ओतून दिले यामुळे शहरातील सामान्य जनतेने जनतेचा आवाज सभागृहात मांडणारा योग्य चेहरा मनोज हामंद होवू शकतो ही शास्वती झालेली असल्याने सभागृहात पाठवायचा निर्धार केलेला दिसत आहे.

मागच्या वेळचा प्रभाग क्र.७ हा यावेळी प्रभाग क्र.८ म्हणून रचना झालेली आहे यामध्ये राममंदिर परिसर,अंबादेवी वार्ड,धर्मशाळा वार्ड तसेच मुंगसाची वार्डाचा समावेश आहे या भागात मनोज हामंद यांचा जनसंपर्क दांडगा असून तसेच प्रभागात मोठ्या प्रमाणात व्यापारी वर्ग राहत असतात सध्या मनोज हामंद यांचीच चर्चा सर्वत्र रंगत आहे. कोरोणा काळात जात,धर्म,वंश न बघता लोकांना केलेली मदत आजही घाटंजी,यवतमाळ तसेच नागपूर रुग्णालयात भरती असलेले रुग्ण परिवाराला मनोज हामंद शक्य त्या पर्यायाने मदत करत असतात.यामुळे शहरात जात,धर्म,पक्ष पाहून यावेळी मतदान नाही तर माणूस पाहून मतदान व्हाव असा नारा देत मनोज हामंद हे प्रभागात आपला प्रचार करतांना दिसत आहे यामूळे मनोज हामंद हा जनतेचा आवाज असल्याची प्रतिमा झाल्यामुळे निश्चित नगरसेवक होतील ही चर्चा स्वाभाविक आहे आणी सुरु पण आहे.

# निफाडमध्ये खोट्या कागदपत्रांचा निषेध

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

**निफाड** — नांदूर मधमेश्वर येथील ५५ गुंठे जागा खोटी कागदपत्रे तयार करून एका समाजाच्या नावावर केल्याच्या निषेधार्थ सकल हिंदू समाज आक्रमक झाला. नाशिकच्या आमदार देवयानी फरांदे यांच्या नेतृत्वाखाली निफाड येथील मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर ठिय्या आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनादरम्यान आंदोलनकर्त्यांनी नाशिक–संभाजीनगर महामार्ग रोखून धरत तीव्र निषेध नोंदवला. आंदोलनकर्त्यांचा आरोप होता की, नांदूर मधमेश्वर येथील ट्रस्टने खोटी कागदपत्रे तयार करून निफाड तहसील कार्यालय आणि भूमी अभिलेख कार्यालयाच्या सहकार्याने ५५ गुंठ्यांची नोंदणी केली.

आंदोलन स्थळी उपविभागीय अधिकारी शशिकांत मंगरूळे उपस्थित झाले व त्यांनी संध्याकाळी सहा वाजेपर्यंत शासकीय जमिनीवरील ग्रामपंचायतीची नोंद रद्द करण्याचे आश्वासन दिले. मात्र आंदोलनकर्त्यांनी तहसीलदार आणि भूमी अभिलेख अधिकाऱ्यांच्या निलंबनाची मागणी केली.



आमदार देवयानी फरांदे यांच्या नेतृत्वाखाली सकल हिंदू समाजाचा ठिय्या आंदोलन

यानंतर महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आमदार देवयानी फरांदे यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करून, अधिकारी दोषी आढळल्यास कारवाई केली जाईल, असे आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले.

या वेळी भाजप जिल्हाध्यक्ष यतीन कदम, बापू पाटील, शंकरराव वाघ, अमृता पवार, सतीश मोरे, हरीचंद भवर, स्वप्नील देशमाने, संजय गाजरे, वैभव कापसे, समाधान कापसे (बजरंग दल) आदी हिंदुत्ववादी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शासकीय जागेच्या जमिनीवरील सदर लावलेली नोंद रद्द करून संध्याकाळी 6 पर्यंत ग्रामपंचायतीचे नाव लावण्याचे आश्वासन प्रांत यांनी दिले

# वाचन प्रेरणा दिनानिमित्त 'केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय'चा वाचनोत्सव उपक्रमाला उत्साही सुरुवात

**दैनिक युवक आधार**
**म्हसळा प्रतिनिधी – शिरीष समेळ**

**म्हसळा :** भारतरत्न डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी राज्यभर "वाचन प्रेरणा दिन" साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर म्हसळा येथील केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय व रायगड जिल्हा परिषद, म्हसळा शाळा क्रमांक ०१ यांच्या संयुक्त विद्यमाने 'वाचनोत्सव उपक्रमाला' उत्साही सुरुवात करण्यात आली. वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी वाचनालयाने या उपक्रमाचे आयोजन केले.



कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून ,दीपप्रज्वलनाने झाली. कार्यक्रमास वाचनालयाचे अध्यक्ष, संजयशेठ खांबेटे, ज्येष्ठ साहित्यिक विलास यादव गुरूजी, केंद्रप्रमुख धामणकर सर , शाला व्यवस्थापन समिती अध्यक्ष शशिकांत शिर्के केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय कार्यकारिणी सदस्य रेखा धारिया,शिरीष समेळ सर, ग्रंथपाल उदय करडे,सायली मॅडम,प्राची मॅडम तसेच प्रशालेच्या मुख्याध्यापिका सुमित्रा खेडेकर,सहशिक्षक इंदिरा चौधरी, श्रीधर उमदी, जयश्री गायकवाड ,मिलिंद मुंढे ,साक्षी जंगम , आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अध्यक्षस्थाना वरून बोलताना संजय खांबेटे यांनी सांगितले की,"वाचन हे केवळ छंद नाही, तर ती एक जीवनदृष्टी आहे. पुस्तकांच्या माध्यमातूनच विचारांची देवाणघेवाण होते आणि समाजात सकारात्मकता निर्माण होते."

वाचन प्रेरणा दिनानिमित्त "वाचन संस्कारातून घडणारे व्यक्तिमत्त्व" या विषयावर रेखा धारिया यांनी प्रबोधनपर मनोगत मांडले त्यांनी डॉ. कलाम यांच्या विचारांचा दाखला देत मुलांनी दररोज किमान ३० मिनिटे वाचनाची सवय लावण्याचे आवाहन केले.

यावेळी विद्यार्थ्यांसाठी पुस्तक वाचन घेण्यात आले त्यामध्ये इयत्ता चौथी या वर्गातील आराध्य भोणकर, स्मित परबळकर, दित्या लोतडा, अनुष्का खोकले, खुशी मोरे, श्रमिक्षा मोरे, विधी राजभर इत्यादी विद्यार्थ्यांनी अस्खलित वाचन केले.

कार्यक्रम प्रसंगी केशवराव खांबेटे सार्वजनिक वाचनालय म्हसळे यांच्या तर्फे विद्यार्थ्यांना दिवाळीच्या सुट्टीत वाचण्यासाठी शालेय स्तरानुसार पुस्तकांचे वाटप करण्यात आले आणि सुट्टी संपल्यानंतर वाचलेल्या पुस्तकाबद्दल अभिप्राय दिसुन आणण्यासाठी सुचना करण्यात आली.

शेवटी सर्व उपस्थितांनी "दररोज एक पान वाचूया – ज्ञानाचा दीप प्रज्वलित करूया" ही शपथ घेत वाचन संस्कृती जिवंत ठेवण्याचा संकल्प केला.या उपक्रमामुळे रायगड जिल्हा परिषद शाळा क्रमांक १ या प्रशालेतील मुलांमध्ये आणि पालकांमध्ये वाचनाविषयी नवी जागरूकता निर्माण झाली असून, भावी पिढीमध्ये पुस्तकांबद्दल प्रेम आणि कुतूहल वाढीस लागेल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## आदिवासी क्रांतिवीर नाग्या कातकरी व बिरसा मुंडा यांच्या वंशजांना विजयी करू - सुधीर ठोंबरे

### चौक जिल्हा परिषद व पंचायत समितीत अनुसूचित जमाती आरक्षण

**दैनिक युवक आधार**
**खालापूर वार्ताहर**

आदिवासी समाजासाठी विकासाचा नवीन टप्पा गाठणारा आणि नवी दिशा देणारा असेल असे मत भाजपा जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे यांनी पुढील चौक जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणूक लक्षात घेत सांगितले .कोणीही नाराज न होता भाजप व महायुतीच्या आदेशाला पाळून सत्ता मिळून जनतेची अविरत सेवा घडावी परिसराचा सर्वांगीण विकास व्हावे यासाठी जोमाने कार्य करण्यासाठी हि संधी समजू असे सुधीर ठोंबरे व मोतीराम ठोंबरे या ठोंबरे बंधूनी सांगितले . आदिवासी समाजासाठी नेहमीच त्यांच्या कडून अडीअडचणी



सोडविण्यासाठी सदैव तत्परता असते . 80 टक्के समाजकारण आणि 20 टक्के राजकारण करणाऱ्या ठोंबरे बंधूनी खेडोपाडी वाडी वस्तीवर विकास कामातून कौटुंबिक जिव्हाळा निर्माण केला आहे. त्यामुळे जरी आरक्षण अनुसूचित जमातीसाठी पडले असले तरी हा दैवी कौल समजून ठोंबरे बंधू झपाट्याने कामाला लागले आहेत .आदिवासी बांधवांच्या सुखदुःखात कायम सहभागी असणारे सुधीर ठोंबरे ,मोतीराम ठोंबरे आणि त्यांची पुढची पिढी चौक ग्रामपंचायत सरपंच रितू ठोंबरे या भागात विकास कामामुळे ओळखले जातात. येणाऱ्या निवडणुकीत भाजपचे जे उमेदवार असतील त्यांना आपले समजून निवडून आणणार असून आदिवासी क्रांतिवीर नाग्या कातकरी व बिरसा मुंडा यांच्या वंशजांना विजयी करण्यासाठी हातभार लागणार असल्याचे सुधीर शेठ ठोंबरे यांनी सांगितले आहे.

## पेसा अंतर्गत देवधरी ग्रामपंचायत विरोधातील आमरण उपोषणाची गटविकास अधिकारी यांच्या लेखी आश्वासनाने सांगता

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

**राळेगाव:-** तालुक्यातील पेसा अंतर्गत येत असलेल्या देवधरी ग्रामपंचायत च्या सरपंच सचिव यांच्या विरोधामध्ये आमरण उपोषणाला बसलेले बंडू भारसकरे सामाजिक कार्यकर्ते व महादेव टेकाम यांनी दि.१३/१०/२०२५ ला पंचायत समिती राळेगाव समोर आमरण उपोषणाला बसले होते त्यांनी वारंवार ग्रामपंचायत देवधरी येथील भ्रष्टाचाराविरुद्ध तक्रारी केल्या होत्या परंतु काही अधिकारी ग्रामपंचायत देवधरी येथील कर्मचाऱ्यांना पाठीशी धरून चौकशी करण्यास नकार देत होते,त्यामुळे बंडू भारसकरे सामाजिक कार्यकर्ते व महादेव टेकाम यांनी आमरण



उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता,परंतु राळेगाव पंचायत समितीचे गटविकास अधिकारी केशव पवार यांनी लेकी आश्वासन घेऊन व पूर्ण मागण्या मान्य करून त्यांच्या आमरण उपोषण समाप्त केले,सहकार्य करणारे उपस्थित बाळू धुमाळ,प्रकाश कुळसंगे, संदीप तेलंगे, दिनेश गोहने, चंदू उगेमुगे, अंकुश चामलटे,सागर हिकरे यांच्या माध्यमातून आमरण उपोषण करिता सहकार्य केले.

## फर्दापूर पोलिसांची धाडसी कामगिरी.... पळसखेडा शिवारात १९ किलो गांजा जप्त......

**दैनिक.युवक आधार**
**सोयगाव प्रतिनिधी विजय काळे**

**सोयगाव:-** तालुक्यातील फर्दापूर मौजे पळसखेडा शिवारात गांजाची बेकायदेशीर लागवड उघडकीस आणत फर्दापूर पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे.या कारवाईत तब्बल १९ किलो गांजा जप्त करण्यात आला असून त्याची किंमत ₹ ९५,६०० इतकी आहे.या प्रकरणी आयसखा शेकलाल तडवी (वय ६९, रा. गोद्री ता. जामनेर, जि. जळगाव) या आरोपीवर फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




सोमवार दि. १३ रोजी रात्री १०:३० वाजता मौजे पळसखेडा शिवारातील गट क्रमांक १७ मध्ये ही कारवाई करण्यात आली. आरोपी आयसखा तडवी याने नामदेव रूपचंद तायडे यांच्या शेतात स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी बेकायदेशीरपणे गांजाची लागवड केली असल्याची गोपनीय माहिती फर्दापूर पोलिसांना मिळाली. छाप्यात तीन प्लास्टिकच्या गोण्या मिळून आल्या.त्यात ओली गांजाची झाडे, खोड व फांद्या असून एकूण वजन १९.१२० किलो वजन भरले .याची किंमत अंदाजे ₹ ९५,६०० एवढी आहे.फर्दापुर पोलीस स्टेशनचे पो.ह.मिरखा तडवी यांच्या फिर्यादीवरून आरोपी आयसखा शेखलाल तडवी याच्या विरोधात फर्दापूर पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.अधिक तपास सपोनि प्रफुल्ल साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पो.उप. नि चंद्रशेखर पाटील,पो.ना.निलेश लोखंडे,पोकॉ योगेश कोळी,पोकॉ जगदीश सोनवणे,पोकॉ राहुल नेवरे,पोकॉ विनोद कोळी हे करीत आहे.फर्दापूर पोलिसांच्या या धाडसी कारवाईचे परिसरात कौतुक होत आहे. पोलिसांनी पुढील तपास सुरू केला असून गांजाच्या लागवडीमागील साखळी शोधण्याचे काम सुरू आहे.

## सुकापूर येथे फटाका सॉल चे उदघाटन

**दैनिक युवक आधार**
**जगदीश क्षीरसागर**

दिपवाली आली म्हणजे व्यवसायाला आणि त्यातल्या त्यात खास म्हणजे दिवाळीत वाजणारे फटाके, म्हटलं तर लहानापासून मोठ्यापर्यंत आवडणारी वस्तू, तर या असे

हे फटाके गरिबांपासून श्रीमंत पर्यंत ही आवड सर्व नागरिकांना आहे तर ती आवड सर्वांना मिळावी म्हणून श्री:जगदीश दशरथ क्षिरसागर , यांनी श्री स्वामी समर्थ यांच्या नावाने फटाक्यांचे दुकान पालीदेवद सुकापुर संविधान रेसिडेन्सी , शॉप नंबर 1,जरी मरी आई मंदिर येथे उभारले आहे



आणि त्या शॉप चे उद्घाटनासाठी ग्रुप ग्रामपंचायत पाली देवद (सुकापुर) च्या सरपंच सौ: ज्योती रवींद्र केणी , यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले,व ग्रामपंचायत सदस्या सौ: पुनम प्रमोद भगत,ॲड: रवींद्र पांडुरंग केणी,, विजय खकाळ, मनसे विभागीय अध्यक्ष सुकापुर मा:श्री :राज क्षिरसागर, मनसे विभागीय अध्यक्ष नवीन पनवेल किरण गावडे, मनसे शाखाध्यक्ष सुकापुर जयवंत बाबरे , नरेंद्र म्हात्रे उद्योजक,श्रीराम केणी ,मनसे सुकापुर शाखा उपाध्यक्ष मा:संतोष गायकवाड, संजय मुंढे, अशोक पाटील, प्रदीप पवार, स्वप्निल सोनावणे ,सुनील क्षिरसागर ,महेश रसाळ ,असे इतर नागरीक मित्र परिवार व मान्यवर उपस्थित राहून स्वामी समर्थ फटाके स्टॉलचा उद्घाटन सोहळा पार पडला,

अशाप्रकारे मित्र मंडळी नातेवाईक आपल्या भागातील नागरिकांनी अवश्य येऊन श्री स्वामी समर्थ फटाके स्टॉलला भेट देऊन होलसेल दरात फटाके घ्यावे विनंती

## शिवाजी विद्यालयात वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**रिसोड (प्रतिनिधी) रणजितसिह. ठाकुर**

भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रिसोड येथे 'वाचन प्रेरणा दिन' उत्साहात साजरा करण्यात आला.

स्थानिक श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय,रिसोड येथे भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्याच्या उद्देशाने शासनाच्या वतीने त्यांची जयंती ही वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीस प्राचार्य मा.संजय देशमुख यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शाळेचे ग्रंथपाल श्री बापूसाहेब सरनाईक, जेष्ठ प्राध्यापक श्री अरुण लिमजे यांची उपस्थिती होती. यावेळी विद्यार्थ्यांनीही डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना आदरांजली वाहिली. आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये प्राचार्य संजय देशमुख यांनी डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जीवनावर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांनी जीवनात विशिष्ट ध्येय घेऊन मार्गक्रमित होण्याचे आवाहन केले व डॉक्टर कलामांसारखा जीवनाचा आदर्श घ्यावा. कोणतीही गोष्ट मिळविण्यासाठी जीवनामध्ये प्रयत्नाची पराकाष्ठा केल्याशिवाय तरणोपाय नाही आणि संकटावर मात केल्याशिवाय जीवनाला आयाम मिळत नाही असे सांगितले. यावेळी प्राध्यापक मोहम्मद जुनेद व साबिया मॅडम यांचीही समायोजित भाषणे झाली. शाळेचे ग्रंथपाल श्री बापूसाहेब सरनाईक यांनी विद्यार्थ्यांना विविध बहुपयोगी पुस्तकांची माहिती दिली व विद्यार्थ्यांनी असंख्य पुस्तकाचे वाचन करावे असे आवाहन केले.या प्रसंगी शाळेतील सर्व शिक्षक वृंद,



प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी हजर होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तसेच आभार प्रदर्शन प्रा. विजय देशमुख यांनी केले.

# घाटकोपरमध्ये वृत्तपत्र विक्रेता दिवस जल्लोषात साजरा

### मिठाई वाटप, कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त सहभाग

**दैनिक युवक आधार**
**घाटकोपर,(केतन भोज)**

वृत्तपत्र विक्रेते हे समाजाच्या जागृतीचे खरे शिल्पकार असून, लोकांपर्यंत घडामोडींची पहाट घेऊन येणारे हे समाजाचे अग्रदूत आहेत. अशा या वृत्तपत्र विक्रेत्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी आज दिनांक 15 ऑक्टोबर 2025 रोजी घाटकोपर वृत्तपत्र विक्रेता संघ / सेनेच्या वतीने 'वृत्तपत्र विक्रेता दिवस' उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात पहाटे सकाळी 6 वाजता कै. वामनराव कोठावदे चौक (तात्या), हिंदू सभा हॉस्पिटलजवळ करण्यात आली. पारंपरिक पद्धतीने आणि ढोल-ताशांच्या गजरात मिठाई वाटप करून विक्रेत्यांनी दिवसाचा जल्लोष साजरा केला. परिसरात आनंदाचे आणि एकतेचे वातावरण निर्माण झाले होते.




या प्रसंगी घाटकोपर परिसरातील सर्वच वृत्तपत्र विक्रेते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे वृत्तपत्र विक्रेत्यांनीच आपले संघटन व एकात्मतेचा भाव दाखवत हा दिवस स्वयंप्रेरणेने साजरा केला.

या कार्यक्रमाला बृहन्मुंबई वृत्तपत्र विक्रेता संघाचे कार्याध्यक्ष मधुसुदन सदडेकर, तसेच देव-देश प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ. वैभव देवगिरकर हे मान्यवर उपस्थित होते. त्यांनी विक्रेत्यांच्या कार्याची प्रशंसा करत, समाजात बातमीदार व वृत्तपत्र विक्रेत्यांची भूमिका अतिशय महत्त्वाची असल्याचे सांगितले.

यावेळी विवेक विचार मंच मुंबई चे संयोजक मा. जयवंत तांबे, तसेच दीपक गवळी, अशोक शिंदे, रवि संसारे, प्रकाश गिलबिले, प्रकाश वाणी, अशोक हांडे, नितीन रेनुसे, युनूस पटेल, प्रदीप मोरणकर, गणेश भोर, किशोर येवले, विजय कोठावदे, विलास कोठावदे, संतोष वाकचौरे, विपुल गायकवाड, धनंजय शेलार, दीपक पवार, अंकुश खरात, विजय बिल्लारे, ब्रह्मानंद पांगे व इतर अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

# शाळा व्यवस्थापन समितीचे पुनर्गठन – गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि शाळा विकासासाठी नव्या समितीची ध्येयदिशा निश्चित

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड (प्रतिनिधी): प्रकाश गवारे**

शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास साधण्यासाठी पालकांचा सहभाग अत्यावश्यक मानला जातो. याच उद्देशाने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा मेंडका (केंद्र – मुदखेड, ता. मुदखेड, जि. नांदेड) येथे दि.१४ ऑक्टोबर २०२५ रोजी शाळा व्यवस्थापन समितीचे (School Management Committee – SMC) पुनर्गठन करण्यात आले. शिक्षण हक्क कायदा२००९ नुसार ही समिती स्थापन करण्यात येते. पालकांचा शाळेच्या कारभारातील सहभाग वाढवून दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून देणे हे या समितीचे ध्येय आहे.

शाळा व्यवस्थापन समितीची निवड प्रक्रिया पारदर्शक आणि लोकशाही पद्धतीने पार पडली. समारंभास पालक, ग्रामपंचायत सदस्य, शिक्षक आणि शिक्षणप्रेमी यांची उपस्थिती होती. समितीचे गठन जाहीर होताच शाळा परिसरात विकासाचा नवा संकल्प जागृत झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

नवीन शाळा व्यवस्थापन समिती २०२५-२६

क्र. सदस्याचे नाव पद

1 श्री. गंगेश्वर गोविंद कोरेबैनवाड अध्यक्ष आज दि १४ऑक्टोबर २०२५ ते १३ऑक्टोबर २०२६ यां वर्षासाठी तर पुढील एक वर्षाचा अध्यक्ष

**पद**

श्री. लक्ष्मण पुंडलिक निखाते हे राहणार आहेत

3 सौ. पूजा रामराव बारतोंडे सदस्य
4 श्री. तुकाराम संभाजी देवडे सदस्य
5 सौ. अंजली विशाल हाटकर सदस्य
6 श्री. बजरंग विश्वनाथ वसुरे सदस्य
7 सौ. रेखा लक्ष्मण आस्कुलवाड सदस्य
8 सौ. अनुसया अशोक पवार सदस्य
9 श्री. गहनाजी नामदेव हाटकर सदस्य
10 श्री. नामदेव कामेश्वरी आडबे सदस्य
11 सौ. अंजली माधव निखाते सदस्य



12 श्री. रामेश्वर कोंडीबा बोदमवाड शिक्षणतज्ज्ञ

13 श्री. नारायण गौतम निखाते ग्रामपंचायत सदस्य प्रतिनिधी

शाळेच्या प्रगतीसाठी नव्या समितीचा संकल्प

समितीचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर गंगेश्वर कोरेबैनवाड यांनी आपल्या मनोगतात शाळेचा सर्वांगीण विकास, विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणाची हमी, तसेच मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्धार व्यक्त केला. शाळेतील पाणीपुरवठा, स्वच्छता, ग्रंथालय वाढ, क्रीडा साहित्य, संगणक शिक्षण, डिजिटल वर्ग अशा विविध उपक्रमांना गती देण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

उपाध्यक्ष लक्ष्मण निखाते यांनी शाळेला गावकऱ्यांचे सहकार्य मिळावे, पालकांची शाळेकडे असलेली जबाबदारी समजावी आणि गळती टाळण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यावर भर देण्याची गरज असल्याचे सांगितले.

**शिक्षणतज्ज्ञांचे मार्गदर्शन**

समितीतील शिक्षणतज्ज्ञ म्हणून निवड झालेल्या श्री. रामेश्वर बोदमवाड यांनी RTE कायद्याचे पालन, शाळा विकास आराखडा, शिक्षक-विद्यार्थी गुणात्मक संबंध आणि मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे योगदान महत्त्वाचे असल्याचे स्पष्ट केले.

**ग्रामपंचायतचाही सहकाराचा शब्द**

ग्रामपंचायत प्रतिनिधी नारायण निखाते

समारंभात शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, तसेच ग्रामस्थांनी नव्या समितीचे स्वागत केले. पालकांच्या सक्रिय सहभागामुळे ही समिती शैक्षणिक उन्नतीसाठी मोलाचे योगदान देईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

समारोप: नव्याने गठित शाळा व्यवस्थापन समितीमुळे मेंडका गावातील शैक्षणिक वातावरण उन्नत होईल, अशी आशा व्यक्त केली जात आहे. शाळातील शिक्षक पंचलिंग सर, पाटील सर, इंजेवाड सर,बाचेवाड सर, खोडके सर, इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालय मुख्याध्यापक चंदलवाड सर,भुरे मॉडम,सावते मॉडम,नवाडे मॉडम शिक्षक -गावातील विद्यार्थी पालक उपस्थितांचे नाव पोलिस पाटील गोविंद वसुरे,शंकर पामलवाड सर,शरद निखाते, कल्याण निखाते,दत्ता निखाते, प्रेम निखाते, शामराव निखाते, प्रकाश हाटकर, उत्तम पाटील जनजावळे माझी अध्यक्ष सुभाष जनजावळे पाटील विचार आणि अभिनंदन या त्रिसूत्रीच्या माध्यमातून दर्जेदार शिक्षणाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकण्यात आले आहे.

## चलो मेंडका! दीपावलीनिमित्त ओपन कबड्डी स्पर्धा – विजेत्यांसाठी आकर्षक बक्षिसांची राशी

**दैनिक युवक आधार**
**मुदखेड प्रतिनिधी : प्रकाश गवारे**

कबड्डी हा ग्रामीण भागातील लोकप्रिय खेळ असून, युवकांच्या अंगी खेळाबरोबर शिस्त, धैर्य आणि संघभावना विकसित करणारा खेळ म्हणून ओळखला जातो. अशाच कबड्डीप्रेमींसाठी आनंदाची बातमी म्हणजे यंदाही मौजे मेंडका (ता. मुदखेड, जि. नांदेड) येथे अत्यंत प्रतिष्ठेची चौथी वर्षाची एक दिवसीय डे-नाईट खुली कबड्डी स्पर्धा दिमाखात आयोजित करण्यात आली आहे.

ही स्पर्धा शनिवार, दि. २५ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता इंदिरा गांधी माध्यमिक विद्यालयाच्या मैदानावर भव्यदिव्य वातावरणात सुरू होणार आहे. स्पर्धेसाठी प्रवेश फी ५०० रुपये ठेवण्यात आली असून, परिसरातील नामांकित पथकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

आकर्षक बक्षीस योजना – विजेत्यांसाठी सुवर्णसंधी

या स्पर्धेत प्रथम ते आठव्या क्रमांकापर्यंत विजेत्या संघांसाठी रोख बक्षीस व ट्रॉफी देण्यात येणार असून, बक्षीसांची खालीलप्रमाणे आकर्षक रचना आहे –

**क्रमांक बक्षीस रक्कम प्रायोजक**

प्रथम बक्षीस₹31,000/- कै. गणपती कोंडीबा बोदमवाड यांच्या स्मरणार्थ – डॉ. अवधुत गणपती बोदमवाड (लोपमुद्रा ट्रस्ट, पुणे)

द्वितीय बक्षीस₹21,000/- श्री दत्ता गोविंदराव बोदमवाड (उद्योजक)

तृतीय बक्षीस₹15,000/- कै. गंगाबाई महाजन यांच्या स्मरणार्थ – श्री रामजी महाजन बक्केवाड

चतुर्थ बक्षीस ₹11,000/- कै. अशोक संभाजी आक्कमवाड यांच्या स्मरणार्थ – श्री जगदिश आक्कमवाड

पाचवे बक्षीस₹7,000/-
सहावे बक्षीस₹5,000/-
सातवे बक्षीस ₹4,000/-
आठवे बक्षीस₹3,000/-

आयोजन समितीची भक्कम तयारी

या स्पर्धेला व्यावसायिक स्पर्श देण्यासाठी समालोचक, पंच कमेटी, टाईमकिपर, ग्राउंड क्युरेटर आदींची स्वतंत्र जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे.

पंच कमिटी:-श्री रामेश्वर कोंडीबा बोदमवाड,श्री विश्वनाथ रामचंद्र चंदलवाड, श्री बालाजी सटवाजी केळकर, श्री जयराम संभाजी चुकेवाड, श्री विनोद मारोती चुकेवाड, श्री आनिल श्रीराम बोदमवाड, श्री तुकाराम परसराम कोरेबैनवाड, श्री साहेबराव, मनोहर सुदेवाड,श्री संतोष रामेश्वर घोसले, श्री संतोष शिवदास आस्कुलकर, श्री सुरेश नागलवाड, श्री विजय जंगीलवाड, श्री देविदास जनजवळे, श्री सुरेश कोरेबैनवाड, श्री परमेश्वर इंजेपवाड, श्री ज्ञानेश्वर जंगीलवाड, श्री श्रीराम दासरे, श्री अशोक बक्केवाड, श्री एकनाथ गायकवाड, श्री अंकुश क्यातमवाड खेळाडूंसाठी उत्तम सुविधा भोजन व्यवस्था: प्रा. श्री साईनाथ व्यंकटराव सुदेवाड यांच्या तर्फे पिण्याचे पाणी: श्री बालाजी रघुनाथ आक्कमवाड (ग्रामपंचायत सदस्य) ग्राउंड व्यवस्थापन: जनता राजा कबड्डी संघ, मेंडका

**नियम व अटी**

1. सर्व सामने महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनच्या नियमांनुसार खेळवले जातील.2. सामना खेळताना जिवीत्वाची जबाबदारी खेळाडूंची स्वतःची असेल.

3. पंच कमिटीचा निर्णय अंतिम मानला जाईल

4. संपर्क क्रमांक

श्री साहेबराव चुकेवाड – 9049285775, श्री प्रकाश पावडे सर – 8805634990, श्री बालाजी नागलवाड – 8698763587, श्री संतोष कोरेबैनवाड – 9022774829, श्री शिवाजी बोदमवाड –7218855777

ही स्पर्धा "चलो मेंडका! कबड्डीचा जल्लोष साजरा करूया!" या घोषवाक्यासह भव्यदिव्य पद्धतीने पार पडणार असून, स्पर्धेसाठी गावकऱ्यांनी उत्स्फूर्त तयारीला सुरुवात केली आहे. परिसरातील कबड्डीप्रेमी आणि क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्पर्धेची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजक समितीने केले आहे.

टीप: मेंडका हे गाव मुदखेड रेल्वे जंक्शनपासून पूर्वेस अवघ्या 3 कि.मी. अंतरावर आहे. आयोजक : सर्व सुजाण कर्मचारी व ग्रामस्थ – मेंडका

## आ. प्रशांत ठाकूर माध्यमातून विविध विकासकामे

### भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**




पनवेल विधानसभा मतदार संघांचे लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून मंजूर झालेल्या सुमारे चार कोटी 88 लाख रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते बुधवारी (दि.15) झाले.

आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेलमध्ये अनेक विकासाची कामे मार्गी लागत असून नागरिकांना विविध सुविधा उपलब्ध होत आहेत. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नामुळे नितळस येथे तीन कोटी चार लाख 99 हजार रुपयांच्या निधीतून मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत इजिमा 21 ते नितळस रस्ता कॉंक्रीटीकरण, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या 16 लाख 86 हजार 434 रुपयांच्या निधीतून व्यायामशाळा तसेच पनवेल महापालिकेच्या एक कोटी 66 लाख 47 हजार 651 रुपयांच्या निधीमधून किरवली येथील भरत पाटील यांच्या घरापासून ते जितेंद्र तरे यांच्या घरापर्यंत आणि भरत पाटील यांच्या घरापासून ते मंदिरापर्यंत रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यात येणार आहे. या सर्व विकासकामांचे भूमिपूजन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.या कामांच्या भूमिपूजनावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, उपाध्यक्ष प्रल्हाद केणी, एकनाथ देशेकर, पनवेल उत्तर मंडळ अध्यक्ष दिनेश खानावकर, नितेश पाटील, यतीन पाटील, चाहूशेठ पाटील, तालुका चिटणीस सचिन पाटील, विनोद पाटील, राम पाटील, बाळकृष्ण पाटील, दीपक उलवेकर, भास्कर आगलावे, राजेंद्र गोंधळी, शैलेश माळी, नासीर शेख, उल्हास पाटील, अशोक साळुंखे, राजेश पाटील, नवनाथ खुटारकर, कैलास मढवी, गुरूनाथ पावशे, बाळू काठे, रूपेश पावशे, दशरथ पावशे, धर्मा पावशे, बळीराम काठे, ग्रामपंचायत सदस्य दर्शना पावशे, सुमिता काठे, सुरेखा सांगडे, अरुण पाटील, सुनील पाटील, अनंता पाटील, कैलास गायकर, हरिश्चंद्र पाटील, गणेश पाटील, पांडुरंग पाटील, सदाशिव पाटील, भगवान पाटील, बबन भोईर, आयुष पाटील, मानव पाटील, यशवंत पाटील, नितेश पाटील, जयदेव गायकर, शक्ती तांडेल, रूपाली काठे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

## ओरायन मॉलने साकारला भला मोठा सिंधुदुर्ग किल्ला';

### मॉल संस्कृतीत आपले सण उत्सव जोपासण्याचा संदेश



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

शिवाजी महाराजांच्या स्वराज्यात किल्ल्यांचे महत्त्व खूप जास्त होते.ते फक्त संरक्षणासाठी नव्हते तर स्वराज्याच्या राजनैतिक, लष्करी आणि आर्थिक धोरणांचा आधार होते. किल्ले ही स्वराज्याची प्रबळ सुरक्षा व्यवस्था होती, ज्यातून शत्रूंपासून स्वराज्याचे संरक्षण करणे, लष्करी कारवाया करणे आणि सैन्यासाठी आश्रयस्थान मिळवणे शक्य झाले. राजगड, रायगड यांसारख्या किल्ले राजधानी आणि प्रशासनाचे केंद्र बनले, तर सिंधुदुर्गसारखे जलदुर्ग समुद्रावरून होणाऱ्या आक्रमणांपासून स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी महत्त्वाचे होते.याच सिंधूदुर्ग किल्ल्याची भव्य प्रतिकृती ओरायन मॉल मध्ये उभारण्यात आली आहे.

दिवाळीत किल्ले बनविण्याची परंपरा आजही बच्चे कंपनी जोपासत आहे.शहरी भागात हि परंपरा काही प्रमाणात लुप्त होत चालली असताना ओरायन मॉल ने हि संस्कृती जपत भव्य सिंधुदुर्ग किल्ला मॉल मध्ये उभारला आहे.दिवाळी निमित्त मॉल मध्ये येणाऱ्या नागरिकांमध्ये आपल्या संस्कृतीचा जागर व्हावा यादृष्टीने हा उपक्रम राबविण्यात आल्याची माहिती ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर यांनी दिली. दरवर्षी दिवाळी आणि विविध सणांना आकर्षक संदेशात्मक देखावे उभारण्याचे काम ओरायन मॉल करते.मॉल संस्कृती जरी पाश्चिमात्य संस्कृतीचा भाग असला तरी आमच्या मार्फत सांस्कृतिक कार्यक्रम आम्ही याठिकाणी राबवून संस्कृतीचे जतन करण्याचे आम्ही प्रयत्न करतो असे मनन परुळेकर यांनी सांगितले.

**किल्ला बांधण्यामागील दृष्टीकोन**

स्वराज्याचे स्थापत्य विषारद हिरोजी इंदलकर यांनी 15 नोव्हेंबर 1664 मध्ये या किल्ल्याच्या उभारणीस सुरुवात केलो.48 एकरातील या किल्ल्यात किती कामगारांनी काम केले. किल्ल्यावर कोणी कोणी हल्ले केले.आदींसह सर्व माहिती या देखाव्याच्या दर्शनीभागात देण्यात आली आहे.

## माणगांव येथे आयोजित "कर्ज योजना मेळावा" ला दिव्यांग बांधवांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-सचिन पवार**

**माणगांव** :-श्री दिव्यांग सामाजिक विकास संस्था माणगांव आणि श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्था महाड व पोलादपूर च्या वतीने तीनही तालुक्यातील दिव्यांग नागरिकांसाठी "कर्ज योजना मेळावा" माणगांव येथील कुंबी भवन हॉल येथे आयोजित करण्यात आले होते. या मेळावा चा उद्दिष्ट दिव्यांग नागरिकांना महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मुंबई अंतर्गत महाराष्ट्र शासनाच्या अंगीकृत उपक्रम संदर्भात दिव्यांग व्यक्तींना ५० हजार ते पाच लाखापर्यंत कर्ज योजनेचा लाभ मिळवून लाभार्थींनी छोटे मोठे व्यवसाय सुरु करण्या पासून ते महाराष्ट्र शासनाच्या अनेक योजना संदर्भातील लाभार्थ्यांना माहिती उपलब्ध करण्याच्या दृष्टीने या मेळाव्यात उपस्थित शासकीय अधिकारी, दिव्यांग संस्थेचे पदाधिकारी व उपस्थित इतर अनेक मान्यवरांकडून सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.



शासनाच्या कर्ज योजणांसाठी दिव्यांग लाभार्थींना आवश्यक असे दाखले व इत्यादी कागद पत्र जमा करण्यापासून ते कर्ज योजनेसाठी भरण्यात येणारे ऑनलाईन व ऑफलाईन फॉर्म व इतर आवश्यक बाबींसाठी माणगांव येथील श्री दिव्यांग सामाजिक संस्थेच्या कार्यालय ठिकाणी कर्ज योजना व शासनाच्या इतर अनेक प्रकारच्या योजणांसाठी सेवा सतत उपलब्ध राहणार असून सदरील योजनेचा लाभार्थ्यांनी भरपूर लाभ घ्यावा असे आवाहन उपस्थित मान्यवर व संस्थे च्या वतीने यावेळी करण्यात आले आहे. माणगांव येथे " कर्ज योजना मेळावा" ठिकाणी महाराष्ट्र राज्य विकास महामंडळ अधिकारी रायगड अलिबाग वर्षा म्हात्रे, रायगड जिल्हा मानवाधिकार अध्यक्ष रशाद करदमे, महसूल सहायक भारती पाटील, सत्वे मॅडम, दीप्ती शेडगे , माजी सभापती मंगेश कदम, माजी नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार, खरवली सरपंच संतोष खडतर, शिवसेना माणगांव तालुका संपर्क प्रमुख वामन बैकर, माणगांव तालुका शिवसेना अल्पसंख्यांक अध्यक्ष सज्जाद गोडमे, शिवसेना गोरेगांव विभाग प्रमुख दिनेश हरवंडकर, रायगड इन्स्टिट्यूट संचालक डॉ. अजय मोरे, लाईन्स क्लब माणगांव अध्यक्ष संदीप नागे, श्री. दिव्यांग सामाजिक विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष इमरान जालगांवकर, श्री समर्थ संस्थेचे रायगड जिल्हाध्यक्ष अशोक अवकीरकर व महाड पोलादपूर तालुका अध्यक्ष सुरेश पाटील, उपाध्यक्ष शैलेश दिलीप बावळेकर,सचिव अनिल जाधव, श्री समर्थ दिव्यांग कल्याणकारी संस्था माजी अध्यक्षा दीप्ती दिलीप शेडगे, बिरवाडी विभाग अध्यक्ष मुकुंद येलकर, बिलाल गोडमे, भागोजी गोलांबडे, इस्माईल परदेशी, अजय जाधव, पाटणूस पोलीस पाटील प्रदीप म्हामुणकर, स्वर्ण जाधव मॅडम, मुकेश शिंदे, श्री.दिव्यांग सामाजिक विकास संस्था कार्यालय माणगांव येथे दिव्यांगांच्या सेवेसाठी सतत सेहकार्याला उपस्थित राहण्यासाठी वचनबद्ध शाहरुख बागवान व इतर अनेक मान्यवर तसेच श्री दिव्यांग संस्था व श्री समर्थ संस्थेचे आजी माजी पदाधिकारी कार्यकर्ते व असंख्य महिला व पुरुष उपस्थित होते.